मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in  E mail - dainikyuvakaadhar@gmail.com  facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले

। मुख्य संपादक - भारती आमले । उपसंपादक - श्री विलास गायकवाड । कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे । निवासी संपादक - श्री राकेश पाटील । सह संपादक - श्री मुकुंद कांबळे । महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 | अंक : ९३ | गुरुवार, ११ डिसेंबर २०२५ | किंमत : ४ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514




# नवी मुंबई विमानतळाला स्व. दि. बा. पाटील साहेबांचे नाव देण्याच्या मागणीसाठी संसदभवनाबाहेर खासदारांचे संतप्त निदर्शने

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्रप्रतिनिधी** : आज बुधवार10 डिसेंबर 2025, रोजी राजधानी दिल्लीतील संसद भवनाच्या आवारातच महाराष्ट्राच्या भूमिपुत्रांचा प्रचंड रोष उसळला आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला राष्ट्रीय नेते स्व. दि. बा. पाटील साहेबांचे नाव देण्यात यावे या ठाम, निर्विवाद मागणीसाठी तडाखेबंद निदर्शने करण्यात आली. महाराष्ट्रातील खासदारांनी एकत्रितपणे दिल्लीच्या दारात उभे राहून केंद्र सरकारसमोर हा प्रश्न भक्कमपणे उभा केला आहे.

या आंदोलनात खासदार सुरेश म्हात्रे (बाळू मामा), खासदार सुप्रियाताई सुळे, खासदार दिना बामा पाटील यांच्यासह महाराष्ट्राचे अनेक खासदार ठामपणे उभे राहिले. भूमिपुत्रांच्या हक्कासाठी लढताना हे सर्व खासदार एकाच



आवाजात एकाच भूमिकेत एकाच निर्धाराने केंद्र सरकारला संदेश देत होते. “दि. बा. पाटील यांचे नाव देणे हा उपकार नाही तर हा आमचा हक्क आहे!”

उरण–पनवेल–नवी मुंबई परिसरातील हजारो कुटुंबांनी विमानतळासाठी दिलेल्या जमिनी, गमावलेली घरे–गावे, मोडलेल्या संसाराची कथा आज पुन्हा एकदा दिल्लीसमोर उभी राहिली. या सर्व त्यागाचा सन्मान म्हणून विमानतळाला दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव देणे ही भूमिपुत्रांच्या स्वाभिमानाची, आत्मसन्मानाची आणि न्यायाची लढाई आहे. मागील अनेक वर्षांपासून हा संघर्ष सुरू असून, आजच्या आंदोलनाने त्याला नवी ऊर्जा मिळाली.

संसदभवनाबाहेर घोषणांचा गर्जनांचा घणाघाती नाद सुरु होता, “दि. बा. पाटील साहेबांचा सन्मान अबाधित ठेवा!” “भूमिपुत्रांचा अपमान सहन करणार नाही!” या घोषणांनी वातावरण क्षणभर दणाणून निघाले आणि दिल्लीने स्पष्टपणे हा रोष, हा आक्रोश आणि हा निर्धार ऐकला. महाराष्ट्रातील सर्वपक्षीय खासदारांनी आज केलेल्या एकमुखी आवाजाने पुन्हा एकदा दाखवून दिले की भूमिपुत्रांच्या प्रश्नावर महाराष्ट्र कधीही मागे हटणार नाही. केंद्र सरकारने तातडीने हा मुद्दा निर्णयप्रक्रियेत आणून भूमिपुत्रांचा मान राखावा, ही ठाम मागणी आजच्या निदर्शनांतून नोंदवण्यात आली.

## रायगड भाजपा सांस्कृतिक सेलतर्फे ‘बिग बॉस १९’ तृतीय विजेता व सुप्रसिद्ध स्टँड-अप कॉमेडियन प्रणित मोरेची भेट

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : रायगड भाजपा सांस्कृतिक सेलच्या पदाधिकाऱ्यांनी हिंदी बिग बॉस सिझन १९ मध्ये तृतीय क्रमांक पटकावणारे आणि पनवेल–खारघरचा गौरव वाढविणारे सुप्रसिद्ध स्टँड-अप कॉमेडियन प्रणित मोरे यांची सदिच्छा भेट घेतली.या भेटीदरम्यान सेलच्या वतीने प्रणित मोरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. बिग बॉसच्या व्यासपीठावर आपल्या दमदार व्यक्तिमत्वाने आणि विनोद



शैलीने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेणाऱ्या मोरे यांच्याशी विविध विषयांवर चर्चाही झाली.या प्रसंगी रायगड भाजपा सांस्कृतिक सेलचे अभिषेक पटवर्धन, गणेश जगताप, चिन्मय समेळ, निखिल गोरे, कौस्तुभ सोमण आणि गोविंद राजपुरोहित उपस्थित होते.

## राज्यपाल आचार्य देवव्रत यांची देवलापार गो-विज्ञान संशोधन केंद्रास भेट

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सतीश कडू संपादक नागपूर** : दि. 9 राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज देवलापार येथील गो-विज्ञान संशोधन केंद्रास भेट दिली. यावेळी गो विज्ञान केंद्राच्या कामाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल,गो-विज्ञान संशोधन केंद्राचे अध्यक्ष पद्मेश गुप्ता, कोषाध्यक्ष हितेंद्र चोपकर आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.





राज्यपाल श्री. देवव्रत यांनी येथील कामधेनु पंचगव्य आयुर्वेद भवनाची पाहणी केली. अवलेह विभाग, वटी, तेल, इंधन, सिरप, प्रयोगशाळा आदींना भेट दिली. येथे निर्माण होणारे फलघृत, हिंग्वाद्यघृत, अष्टमंगलघृत, गांडूळ खत निर्मिती प्रक्रिया, गोमुत्र अर्क, दंतमंजन आदी 30 पेक्षा जास्त उत्पादनांची माहितीही त्यांनी घेतली. यावेळी संशोधन केंद्राच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

रामटेक तालुक्यातील देवलापार येथील गोविज्ञान संशोधन केंद्राने देशी गोवंशाचा विकास हे प्रमुख उद्दिष्ट ठेवले आहे. दुधाएवढेच शेण आणि गोमूत्र हे घटकही महत्त्वाचे असून ते उत्पन्नाचा भक्कम पर्याय ठरू शकतात हेच संस्थेने विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीतून सिध्द केले आहे.

त्याच दृष्टीने देशपातळीवरील संस्थांशी तंत्रज्ञानाबाबत करार करून विविध उत्पादने तयार केली आहेत.

काही उत्पादनांना आंतरराष्ट्रीय पेटंटही मिळवण्यात संस्था यशस्वी ठरली आहे.

## साई परिवार सेवाभावी ट्रस्ट अध्यक्ष मंगेश अंकुश रासम सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (शांताराम गुडेकर)** : सेनादल अधिकारी तथा सीबीआय क्राईम ब्रँच कमांडो ज्येष्ठ अधिकाऱ्यांसाठी आयोजित राष्ट्रीय युवा अधिवेशन नुकतेच तेलंगणा राज्याच्या भाग्यनगर शहरात पार पडले.या तीन दिवसिय अधिवेशनात राष्ट्रभरातील २५ व्यक्ती तथा संस्थांचा विशेष उपस्थितीत सन्मान सोहळा संपन्न झाला. साई परिवार सेवाभावी ट्रस्ट अध्यक्ष श्री. मंगेश अंकुश रासम हे गेली ४० वर्ष समाज सेवेत आणि अन्नदान सेवेमध्ये यशस्वीरित्या परिपूर्ण कार्य करीत आहेत. त्यांच्या या कार्याचा यथोचित गौरव म्हणून ज्येष्ठ आण्विक शास्त्रज्ञ तथा अनेक राष्ट्रांचे आण्विक सल्लागार म्हणून कार्यरत श्री. घंटी सूर्यनारायण मूर्ती यांच्या द्वारा सदर सन्मान वेद फाउंडेशन अध्यक्ष स्वप्नील वाडेकर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.आदिवासी भागातील विवाह सोहळा आयोजन समितीमध्ये कार्यरत असल्यामुळे श्री.मंगेश रासम आदिवासी भागात दिवस रात्र कार्यरत होते

त्यांच्या या कार्यामुळे युथ फॉर् नेशन संस्थेच्या विशेष अधिवेशनात उपस्थित असलेले स्वप्नील राणी नंदकुमार यांनी तो श्री.मंगेश यांच्यासाठी स्वीकारला. भारताचे आण्विक शास्त्रज्ञ यांनी श्री मंगेश रासम यांना आम्ही गत अडीच ते तीन वर्षे ओळखत असून त्यांचा कार्य जवळ पाहत आहोत आणि त्यामुळे त्यांना हा सन्मान विविध लष्करी अधिकारी सैन्य अधिकारी यांच्यासमोर प्रदान करण्यात येत आहे तथा



त्यांची अनुपस्थिती आम्हाला त्रासदायक असली तरी त्यांचं कार्य सतत पुढे चालूच राहावं ही या सन्मानाची शुभकामना आहे असे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले भाग्यनगर मध्ये आयोजित सदर सोहळयामध्ये दिल्लीमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या सर्व शहिदांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली आणि लवकरच सरकार द्वारा होणाऱ्या आतंकवाद विरोधी कारवाईला लष्कराचा पाठिंबा देखील दर्शविण्यात आला.

## डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे काम आणि कन्व्हेंशन सेंटरची डागडुजी लवकरात लवकर पूर्ण करा – सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे काम आणि कन्व्हेंशन सेंटरच्या डागडुजीची कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत, असे निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आज येथे दिले.

कामठी मार्गावरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर येथील सभागृहात आज बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी ते बोलत होते. उत्तर नागपूरचे आमदार नितीन राऊत, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, बार्टीचे महासंचालक सुनील



वारे, समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठानचे व्यवस्थापकीय संचालक सुरेंद्र पवार, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुळकर्णी, सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, सहाय्यक संचालक (वित्त व लेखा) अतुलकुमार वासनिक, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे अधीक्षक अभियंता संजय चिमूरकर, आणि नरेश लभाने, अभियंता आशिष तामगाडगे आदी उपस्थित होते.

ऑडिटोरियम हॉलच्या बाल्कनी भागातील शीतवाहक डक्ट, शीतवाहक यंत्रणेच्या पाईप्सचे इन्स्युलेशन, कॉन्फरन्स रुममधील एअर हँडलिंग युनिट, व्हीआयपी गेस्ट रूम, डिझेल जनरेटर, एक्झिट गेटकडील पाण्याच्या भूमिगत टाकीला वॉटर प्रूफिंग, बेसमेंट पार्कींग आदींची चर्चा बैठकीत करण्यात आली.

ही कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश मंत्री श्री. शिरसाट यांनी यावेळी दिले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 40 फुट उंचीचा पुतळा लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

## कृषी पंपासाठी दिवसा विद्युत पुरवठ्याची मागणी मान्य, आजचा रास्तारोको आंदोलन स्थगित – डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर

**लिंबागणेश पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा, राजेंद्र मस्के( जिल्हाध्यक्ष, रा .कॉ .शरदचंद्र पवार गट) यांची प्रमुख उपस्थिती**

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** - लिंबागणेश परिसरात बिबट्या आढळून आल्याने पिंपरनई, पोखरी (घाट), बेलगाव, सोमनाथवाडी, मसेवाडी, मोरगाव-फुकेवाडी, काळेवाडी, गणेशनगर अशा पंचक्रोशीतील गावांमध्ये ग्रामस्थ व शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. शेतकऱ्यांना रात्री कृषी पंप सुरू असताना पिकांना पाणी देण्यासाठी अंधारात शेतात जाण्याचा धोका वाढत होता. बिबट्याचा वावर लक्षात घेता त्यांच्या जीवितास गंभीर संकट निर्माण होत असल्यामुळे कृषी पंपासाठी दिवसा नियमित वीज पुरवठ्याची मागणी जोर धरत होती. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक



कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी आज गुरुवार दिनांक ११ डिसेंबर रोजी लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा लेखी निवेदनाद्वारे दिला होता. परंतु बुधवार १० डिसेंबर रोजी सकाळी महावितरण उपकेंद्र लिंबागणेश येथे सहाय्यक अभियंता महेश गायकवाड यांच्याशी ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांसोबत चर्चा झाली. ग्रामस्थांची अडचण समजून घेत त्यांनी कृषी पंपांसाठी रात्री ऐवजी दिवसा वीज पुरवठा देण्यास मान्यता दिली. या मुळे आज गुरुवार रोजी होणारा रास्तारोको आंदोलन स्थगित करण्यात आला असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी दिली. या वेळी बैठकीमध्ये प्रमुख्याने मान्यवरांची उपस्थिती होती. या चर्चेला आणि मागणीसाठी पुढाकार घेण्यात राजेंद्र मस्के (जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार गट) यांची प्रमुख उपस्थिती होती. कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्याबाबत त्यांनी सहाय्यक अभियंता, उपकेंद्र लिंबागणेश आणि उपकार्यकारी अभियंता, बीड ग्रामीण विभाग यांना पत्रव्यवहाराद्वारे पाठपुरावा केला आहे. या वेळी बालासाहेब जाधव (सरपंच), राजेभाऊ आप्पा गिरे (माजी पंचायत समिती सदस्य), कल्याण वाणी (माजी सरपंच), रविंद्र निर्मळ (चेअरमन, सेवा सोसायटी), पत्रकार हरिओम क्षीरसागर, दामोदर थोरात, मोहन कोटुळे, बिभीषण मुळीक (सरपंच, पोखरी), बाळासाहेब वायभट (सरपंच, पिंपरनई), शहादेव कोल्हे, पांडुरंग वाणी, अँड.गणेश वाणी, विक्रांत वाणी, सुरेश निर्मळ, संतोष भोसले, अभिजित गायकवाड, सर्पमित्र अशोक जाधव, संतोष वाणी, संजय सुकाळे, तुकाराम गायकवाड, अंबादास ढास, अजित मंडलिक, बिभीषण वाणी, घाडगे गणेश, मुळे जीवन, सचिन गिरे, आरूण निर्मळ, रामदास मुळे, बंकट लगास, विलास वायभट, अभिमान वाणी, कृष्णा वायभट, रविंद्र ढास यांच्या सह इतरांचा समावेश होता.

## मानवी हक्कामुळे माणसाला स्वाभिमानाने जगता येते! – प्राचार्य डॉ.विश्वास कदम

**जय भवानी महाविद्यालयात मानवी हक्क दिन साजरा**

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** : मानवी हक्कामुळेच माणसाला स्वाभिमानाने जगता येते. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.विश्वास कदम यानी केले. जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा येथे लोकप्रशासन व राज्यशास्त्र विभाग आयोजित "जागतिक मानवी हक्क दिन कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणुन बोलत होते. या वेळी पुढे बोलताना ते म्हणाले की माणुस जन्मत:च काही हक्क घेऊन जन्माला येतो व त्या हक्कामुळेच त्याला स्वाभिमानाने जिवन जगण्याचा आधिकार मिळतो. म्हणुन मानवी हक्काचा प्रसार व प्रचार होणे गरजेचे आहे. हे मानवी हक्क आपण समाजातील सर्व घटकापर्यंत प्रसारीत केले पाहिजेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणुन इतिहास विभागाचे प्रमुख प्रा.सोमनाथ घाडगे हे होते. तसेच व्यासपीठावर लोकप्रशासन विभागाच्या प्रमुख प्रा.श्रीमती कल्पना घारगे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व प्रस्ताविक प्रा.श्रीमती कल्पना घारगे यांनी केले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे प्रा.सोमनाथ घाडगे यांनी




मानवी हक्काचे महत्व सांगितले. या प्रसंगी लोकप्रशासन विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या "मानवी हक्क दिन" या भित्तीपत्रकाचे अध्यक्ष व मान्यवरांच्या शुभ हस्ते विमोचन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आभार प्रा.बंडू लोखंडे यानी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## देशात आम्हाला जगण्याचा अधिकार नाही का ?



**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** हलकीचे जीवन जगत असताना आमच्या झोपड्या तोडल्या जातात. आमची मुले संसार रस्त्यावर येत आहे. या देशात आम्हाला जगण्याचा अधिकार नाही का ? असा सवाल मानवाधिकार दिनाच्या पार्श्वभूमीवर या जनतेच्या वतीने मुंबई विभागीय राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन लोंढे यांनी केला आहे. बोरिवली पश्चिम येथील पैनगर झोपडपट्टी परिसरातील रहिवाशांचे कायमस्वरूपी पुनर्वसन व्हावे, या मागणीसाठी सहाय्यक आयुक्त प्रफुल तांबे यांची भेट घेण्यात आली. पै नगर परिसरातील नागरिकांना वारंवार बेघर केले जात असल्याने सर्वसामान्यांवर अन्याय होत आहे. पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कोणत्याही झोपडीवर कारवाई करू नये, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. गरिबाना त्यांच्या हक्काचे घर मिळालेच पाहिजे. पुनर्वसनाशिवाय कारवाई करणे म्हणजे दुर्बल घटकांवर अन्याय करणे होय असे सचिन लोंढे यांनी सांगितले.



ओम साई भक्त मंडळ भटवाडी घाटकोपर सदर मंडळाच्या वतीने काल दत्त जयंती उत्सवानिमित्त कलादर्पण नृत्य आविष्कार निर्माते श्री दीपक तेंडुलकर सर यांच्या लोकनृत्याचा कार्यक्रमाचा आयोजन आल होत कार्यक्रमामध्ये उपस्थित करता कोमल साहिल प्राजक्ता वैशाली विशाल यांनी सहभाग घेतला होता प्रमुख पाहुण्यांचे कार्यक्रमाला उपस्थित लाभली शिवसेनेचे विभाग प्रमुख दीपक बाबा हांडे शाखाप्रमुख श्री प्रवीण (बाबू) साळुंखे समाजसेवक श्री बाळासाहेब हांडे समाजसेवक वैभव आवटे पाटील आणि राजेंद्र पवार साहेब यांनी होम मिनिस्टर व खेळामध्ये भाग घेतलेल्या कलाकारांचे बक्षीस देऊन त्यांचे स्वागत केले होम मिनिस्टर कार्यक्रमासाठी दीपक तेंडुलकर आणि उज्वला पवार मॅडम यांचा मोलाचं योगदान लाभलंसदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय भोसले यांनी केले सदर कार्यक्रमास तुळशीदास उर्फ बाबू मंगेकर व सुरेश साखरे साहेब तसेच दादासाहेब फाळके पुरस्कार सन्मानित ॲक्टर रायटर डिरेक्टर फिल्म मेकर श्री विकास वायाळ यांची उपस्थिती लाभली

**(दैनिक युवक आधार )**

# जलद गतिने तपास होण्याच्या मागनीसाठी नाशिक- छत्रपती संभाजीनगर महामार्गावर रास्ता रोको

## श्री.मतोबा महाराज मुर्ती चोरी प्रकरणाच्या तपासावर भाविक व ग्रामस्थांची तिव्र नाराजी

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी (राहुल कुलकर्णी) :** नाशिक- छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील नैताळे येथीजलद गतिने तपास होण्याच्या मागनीसाठी नाशिक- छत्रपती संभाजीनगर महामार्गावर रास्ता रोको*ल प्रसिध्द देवस्थान श्री मतोबा महाराज मंदिरातुन ३ डिसेंबर रोजी रात्री अज्ञात चोरट्यानी दोन मुर्तीची चोरी केली आहे.या चोरीचा निफाड पोलिसांकडून अद्याप तपास लागत नसल्याने पोलिसांच्या कार्यप्रणालीवर भाविकांनी व ग्रामस्थांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे.चोरीचा तपास जलद गतीने व्हावा या मागनीसाठी आज सकाळी १०-१५ वाजता नाशिक-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर लासलगाव बाजार समितीचे संचालक व माजी सरपंच राजेंद्र बोरगुडे,शिवाजी बोरगुडे, दादा बोरगुडे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो भाविकांनी व ग्रामस्थानी जवळपास एक तासापेक्षा जास्त वेळ रास्ता रोको आंदोलन करण्यात आले .पोलिस उपअधिक्षक कांतीलाल पाटील यांच्या आश्वासनानंतर त्याना निवेदन देऊन आंदोलन मागे घेण्यात आले.

नाशिक ग्रामिणचे पोलिस अधिक्षक यांच्या नावाने दिलेल्या निवेदनात म्हटले



आहे कि लाखो भाविकांचे श्रध्दास्थान व नैताळे ग्रामस्थांचे अराद्य दैवत श्री मतोबा महाराज यांच्या मंदीरातुन दिनांक ३ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १ ते २ वाजेच्या सुमारास चांदीच्या तीन किलो वजनाच्या दोन मुर्तीची व दान पेटीची अज्ञात चोरट्यानी चोरी केली असुन या घटनेमुळे ग्रामस्थामध्ये तिव्र संताप व्यक्त होत असुन पोलिस प्रशासन चोरट्याना व मुर्तीना अजुनही शोधू शकले नसल्याने भाविक व ग्रामस्थामध्ये तिव्र नाराजी व्यक्त होत आहे. ३ जानेवारी २०२६ रोजी श्री मतोबा महाराज यांचा अखंड १५ दिवस चालणारा यात्रोत्सव सुरु होणार आहे यावेळी महापुजेसाठी व रथ मिरवनुकीसाठी मुर्तीची आवश्यकता आहे मुर्ती चोरी प्रकरणाचा व आरोपीचा अद्याप शोध लागत नसल्याने पोलिसाच्या कार्यप्रणालिवर तिव्र नाराजी व्यक्त केली आहे. शिवाय या देवस्थानला खासदार भास्कर भगरे व आमदार दिलीपराव बनकर यांनी भेट देऊन अधिकाऱ्यांना तपासाच्या सुचना केल्या आहेत मात्र अद्याप मुर्ती चोरीमुळे नैताळे येथे जिल्हा पोलिस प्रमुख,जिल्हाधिकारी ,प्रांताधिकारी या आधिकार्यानी या प्रकारणाची दखल घेतली नाही शिवाय देवस्थानला भेटही दिलेली नाही तेव्हा ग्रामस्थांच्या व भाविकांच्या श्रध्देचा विचार करुन या चोरी प्रकारणाचा तातडीने तपास करुन भाविकाना व ग्रामस्थाना दिलासा द्यावा असेही निवेदनात शेवटी म्हटले आहे रास्ता रोको आंदोलन प्रसंगी तहसिलदार कार्यालयाच्या वतीने मंडळ अधिकारी अश्विनी भोसले, तलाठी आईटवार पोलिस कर्मचाऱ्यांसह शेकडो संखेने भाविक व ग्रामस्थ उपस्थित होते.

> नाशिक-छत्रपती संभांजीनगर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन सुरु असताना अचानक अँम्बुलन्स चा आवाज आल्याने सवेंदनशिलता लक्षात घेऊन आंदोलन कर्त्यानी तातडीने रस्ता मोकळा करुन दिला

> भाविकांच्या व ग्रामस्थांच्या श्रेदेचा व भावनेचा आम्ही आदर करतो ,मुर्ती चोरी प्रकरणाचा तपास प्रकारणात पोलिसांच्या अनेक टिम काम करत असुन लवकरात लवकर तपास करुन भाविकांना व ग्रामस्थाना दिलासा देऊ..!
>
> - कांतीलाल पाटील.
> पोलिसउपआधिक्षक ,निफाड

> श्री मतोबा महाराज देवस्थानातील मुर्ती चोरीचा विषय हा लाखो भाविकांच्या व ग्रामस्थाच्या श्रेध्देचा विषय आहे .३ डिसेंबर पासुन मुर्ती चोरीमुळे तिव्र स्वरुपाचा संताप व्यक्त होत आहे.पोलिसानी जलद गतिने तपास करुन दिलासा द्यावा अन्यथा पुन्हा आंदोलन केले जाईल
>
> -केशव नाना बोरगुडे
> विश्वस्त- श्री मतोबा महाराज देवस्थान

# नवरगाव कला ग्रामपंचायतीचा उपक्रम श्रमदानातून उभारला भक्कम वनराई बंधारा

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी गोंदिया** : मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना अंतर्गत गावातील वाढत्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी नवरगाव कला ग्रामपंचायतीने गावकऱ्यांच्या श्रमदानातून उभारलेला वनराई बंधारा आज पूर्णत्वास पोहोचला. जलसंधारणासाठी राबवलेल्या या सामूहिक उपक्रमामुळे गावात समाधान आणि उत्साहाचे वातावरण असून भूगर्भजल पातळी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



गेल्या काही वर्षांपासून उन्हाळ्यात विहिरी व बोअरवेल्स कोरड्या पडण्याच्या घटना वाढल्या होत्या. युवक मंडळे, महिला बचत गट, जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी– शिक्षक आणि स्थानिक शेतकरी श्रमदान करून सुमारे 120 फूट लांबीचा हा बंधारा भक्कमपणे पूर्ण केला. बंधाऱ्यामुळे शेतांना पाणी उपलब्ध होऊन पिकांचे उत्पादन वाढण्यास मदत होणार असल्याचे शेतकऱ्यांचे मत आहे.

ग्रामपंचायतीचे सरपंच कार्तिक हेमने यांनी सांगितले की, “गाव विकासासाठी लोकसहभाग सर्वात महत्त्वाचा. नवरगाव कला गावकऱ्यांनी दाखवलेला उत्साह आणि एकजूट हा इतर गावांसाठीही प्रेरणादायी आदर्श आहे.”पर्यावरणप्रेमींच्या मते, जलसंधारणाचा हा उपक्रम केवळ पाणी अडविण्यापुरता मर्यादित नसून आगामी पिढ्यांसाठी टिकाऊ भवितव्याचा पाया आहे.

# क्रीडा शिक्षक कांतीलाल पाटील यांची नॅशनल कोच म्हणून निवड

## विद्यार्थिनी एंजल पारचेची नॅशनल सायकलिंग स्पर्धेसाठी निवड

## राज्यस्तरीय स्पर्धेत नेहाल चोरघेचा दुसरा क्रमांक – शाळेत आनंदाचा जल्लोष

**संतोष आमले पनवेल/ प्रतिनिधी :** डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेने क्रीडा क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. शाळेचे क्रीडा शिक्षक कांतीलाल पाटील यांची नुकतीच नॅशनल कोच म्हणून निवड झाली असून, बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांना सक्षम खेळाडू म्हणून घडविण्यात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे.अहमदनगर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय सायकलिंग स्पर्धेत शाळेतील विद्यार्थिनी एंजल पारचे हिने उत्कृष्ट कामगिरी करत नॅशनल



सायकलिंग स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. तसेच या स्पर्धेत नेहाल चोरघे याने कठीण स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकवून शाळेच्या क्रीडा कामगिरीत भर घातली.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार मारुती जाधव, संस्थेचे खजिनदार अतुल वाणी, सचिव सुरेश जाधव, तसेच सौ. श्रेया नंदकुमार जाधव यांनी विद्यार्थ्यांचे आणि क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या कामगिरीनंतर शाळेतील सर्व कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




# एमडीएलएसए, माझगाव येथे पीएलव्ही प्रशिक्षणार्थ्यांसाठी अमली पदार्थ व्यसनावरील जनजागृती सत्र

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** मुंबई जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (MDLSA) यांनी आपल्या कार्यालयात, सरदार बलवंतसिंग धोडी मार्ग, माझगाव, मुंबई – ४०००१० येथे पीएलव्ही (Para Legal Volunteer) प्रशिक्षणार्थ्यांसाठी अमली पदार्थ व्यसनाविषयी सर्वसमावेशक जनजागृती सत्राचे आयोजन केले. महाराष्ट्र नशाबंदी मंडळाचे कार्यकारिणी सदस्य आणि राष्ट्रीय प्रशिक्षक असलेले बॉस्को डिसोझा यांनी हे सत्र घेतले. या सत्राचा उद्देश विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचे स्वरूप, कारणे, सामाजिक-कायदेशीर परिणाम आणि प्रतिबंध व पुनर्वसनाच्या उपाययोजना यांची सखोल माहिती देणे हा होता.

डिसोझा यांनी सांगितले की अमली पदार्थांचा “वापर, गैरवापर आणि दुरुपयोग” असा त्रिस्तरीय पद्धतीने विचार केला जातो. वैध वैद्यकीय वापर आणि गैरजबाबदार वापर यात मोठा फरक आहे यावर त्यांनी भर दिला. व्यसन ही हळूहळू विकसित होणारी गुंतागुंतीची अवस्था असून ती कुतूहल, सहकाऱ्यांचा प्रभाव किंवा औषधांच्या चुकीच्या वापरातून सुरू होऊ शकते. वैयक्तिक निवडींपलीकडे जैविक, मानसिक आणि सामाजिक-आर्थिक घटकांमुळेही व्यसन वाढते, असे त्यांनी स्पष्ट केले. विशेषतः आनुवंशिक प्रवृत्ती, आर्थिक अस्थिरता आणि डिजिटल



व्यसन हे आजच्या काळातील महत्वाचे कारणे असल्याचे त्यांनी नमूद केले.

व्याख्यात्यांनी अमली पदार्थांचे दोन प्रमुख प्रकार—कायदेशीर आणि बेकायदेशीर—या गटांत विभाजन केले. दोन्ही प्रकारचे पदार्थ गैरजबाबदारीने घेतल्यास गंभीर हानी करू शकतात. अल्कोहोल, तंबाखू आणि काही औषधे कायदेशीर असली तरी त्यांचा "सुरक्षित" असा गैरसमज मोठ्या प्रमाणात गैरवापरास कारणीभूत ठरतो. बेकायदेशीर पदार्थ निर्मिती व वितरण अनियंत्रित असल्याने ते अधिक धोकादायक ठरतात, असे त्यांनी सांगितले.

डिसोझा यांनी विविध व्यसनाधीन पदार्थांच्या दुष्परिणामांचा उल्लेख करताना संसर्ग, ओव्हरडोस आणि जलद व्यसनाधीनता यांसारख्या धोका अधोरेखित केला. काही राज्यांत दारूबंदी असतानाही मद्यविक्री सुरूच असल्याचे, तसेच सामाजिक स्वीकारामुळे त्याचे सेवन मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे त्यांनी सांगितले. तरुणांमध्ये "ऊर्जा वाढवणे", "मनोरंजन" किंवा "तात्पुरत्या मानसिक आरामासाठी" पदार्थांचे सेवन वाढत चालले आहे याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. फक्त तीन वेळा सेवन केले तरी काही व्यक्तींमध्ये व्यसन निर्माण होऊ शकते, अशी त्यांनी सूचना केली.

इ-सिगारेट आणि व्हेप्सच्या वाढत्या वापराविषयी बोलताना त्यांनी सांगितले की हे "सुरक्षित पर्याय" म्हणून चुकीच्या पद्धतीने विक्री केले जातात. दिशाभूल करणारी जाहिरात, मित्रांचा प्रभाव आणि डिजिटल माध्यमांमधील ट्रेंड्स यामुळे युवकांमध्ये चुकीची सुरक्षिततेची भावना निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. डिजिटल व्यसन, चिंता, एकाकीपणा आणि भावनिक अस्थिरतेमुळे व्यक्ती पदार्थांच्या व्यसनाकडे वळत असल्याचे त्यांनी सांगितले.

सत्राच्या शेवटी, डिसोझा यांनी व्यसनातून मुक्त होण्यासाठी लवकर ओळख, समुपदेशन, वैद्यकीय हस्तक्षेप, समुदायाचे सहकार्य आणि वर्तनातील बदल यांसारख्या रणनीती सांगितल्या. व्यसनाला नैतिक दृष्टीकोनातून न पाहता आरोग्यविषयक समस्या म्हणून पाहणे आवश्यक असल्यावर त्यांनी भर दिला. पीएलव्ही विद्यार्थ्यांनी जनजागृतीच्या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा आणि व्यसनग्रस्तांना सहानुभूती, गोपनीयता आणि योग्य मार्गदर्शन द्यावे, असे आवाहन केले.

या कार्यक्रमात विवेक साळवी (समन्वयक) यांनी पुनर्वसनानंतर व्यक्ती कशाप्रकारे गुणवत्तापूर्ण जीवन जगू शकते आणि व्यावसायिक मार्गदर्शनाचे महत्त्व यावर सविस्तर माहिती दिली.

चेतना सावंत, मुंबई समन्वयक – नशाबंदी मंडळ यांनी नशाबंदी मंडळाच्या कार्यपद्धतीची माहिती दिली.

सत्राचा समारोप संवादात्मक चर्चेने झाला, ज्यात प्रशिक्षणार्थ्यांनी पुनर्वसन प्रक्रिया आणि समाजातील सहभाग याबद्दल प्रश्न विचारले. सहभागी विद्यार्थ्यांनी सत्रातील व्यवहार्य मार्गदर्शन आणि सामाजिक वास्तवांवरील प्रकाश टाकल्याबद्दल समाधान व्यक्त केले. एमडीएलएसएने भविष्यातही अशा जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करत राहणार असल्याचे सांगितले.

हा कार्यक्रम मा. न्यायमूर्ती पवन तापडिया, सचिव – डीएलएसए मुंबई, तसेच सुश्री मनीषा चव्हाण आणि कार्यालयाच्या टीम यांनी उत्तमपणे आयोजित केला. अतिथि व्याख्याते प्रा. केशव तिवारी (अस्मिता लॉ कॉलेज) यांनीही कार्यक्रमाला विशेष उपस्थिती दर्शविली.

दैनिक युवक आधार हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# २५ वर्षांनंतर चिखलवर्धात क्रीडा-कला महोत्सवाची दमदार पुनरावृत्ती

## जि. प. शाळेच्या भव्य व्यवस्थापनाची सर्वत्र चर्चा

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेन्दोर** : चिखलवर्धा जि. प. उच्च प्राथमिक मराठी शाळा आणि जि. प. उर्दू शाळा यांच्या संयुक्त पुढाकारातून सुरू झालेल्या केंद्रस्तरीय क्रीडा व कला स्पर्धांनी गावाचे वातावरण उत्साहाने भरून गेले आहे. ९ ते ११ जानेवारीदरम्यान होणाऱ्या या स्पर्धांना २५ वर्षांनी मिळालेल्या यजमानपदामुळे गावकऱ्यांमध्ये वेगळाच अभिमान पाहायला मिळाला.उद्घाटन कार्यक्रमाने पहिल्याच दिवशी उपस्थितांचे मन जिंकले. आकर्षक प्रास्ताविक, संयोजक शिक्षकांचा अचूक समन्वय, विद्यार्थ्यांच्या तालीमेने सजलेली रंगतदार परेड आणि नयनरम्य सजावट यामुळे कार्यक्रमाला अप्रतिम शोभा प्राप्त झाली. मैदानाची सुबक आखणी, स्वच्छता आणि सर्वांचे स्वागत करणारे वातावरण पाहून पाहुण्यांनी चिखलवर्धा शाळेची प्रशंसा केली.



या स्पर्धांसाठी १३ शाळांचे विद्यार्थी व शिक्षक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, तंटामुक्ती समिती, शाळा व्यवस्थापन समिती तसेच गावातील मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरली. शिक्षण विस्तार अधिकारी साबापुरे, केंद्र प्रमुख यमसनवार आणि केंद्र मुख्याध्यापक किरणापुरे यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रमाला अधिक प्रतिष्ठा लाभली.

स्पर्धकांसाठी केलेली स्वच्छ आणि चोख भोजनव्यवस्था, खेळाच्या मैदानाची रंगतदार मांडणी आणि शिक्षकांनी दाखवलेले नियोजन कौतुकास्पद ठरले. अनेकांनी "इतक्या वर्षांनंतर एवढे सुबक व आदर्श आयोजन पाहून आनंद झाला" अशी प्रतिक्रिया दिली.चिखलवर्धा शाळेने २५ वर्षांनंतर मिळालेल्या संधीचे खरे मूल्य ओळखत अविस्मरणीय आणि शिस्तबद्ध आयोजन करून गावाच्या नावलौकिकात भर घातली आहे

# रायगड जिल्हा परिषद शाळांमध्ये वक्तृत्वाचा जल्लोष

## कोपरा, मुर्बी व खारघर येथील उत्कृष्ट २४ विद्यार्थ्यांचा गौरव

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धा २०२५" अंतर्गत रायगड जिल्हा परिषद शाळांच्या आंतरशालेय पारितोषिक वितरण सोहळ्याचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोपरा, मुर्बी आणि खारघर येथील विद्यार्थ्यांनी मोठ्या जोमाने सहभाग घेतला. विविध फेऱ्यांमध्ये प्रभावी कामगिरी सादर करत एकूण २४ विद्यार्थ्यांनी विजेतेपद पटकावले, तसेच या प्रतिभावान विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी शिक्षणाचे महत्त्व, माझे स्वप्न, पर्यावरण संवर्धन, प्लास्टिकमुक्त भारत, डिजिटल युगातील विद्यार्थी, जर मी नेता असतो अशा विषयांवर प्रभावी,



स्पष्ट आणि आत्मविश्वासपूर्ण मांडणी करून प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांच्या विचारांची खोली व भाषणकलेची रचना पाहून उपस्थितांनी भरभरून दाद दिली. सोहळ्याला विद्यार्थ्यांचे पालक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी वक्तृत्वाच्या व्यासपीठावर मिळवलेले हे यश सर्वांसाठी अभिमानाचे ठरले.

स्पर्धा प्रमुख मयुरेश नेतकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सांगितले कि, "कोपरा, मुर्बी आणि खारघर येथील रा. जि. प. शाळांमधील विद्यार्थ्यांची कामगिरी प्रेरणादायी आहे. अशा स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील मुलांना आत्मविश्वास वाढवण्यास आणि स्वतःला सिद्ध करण्यासाठी उत्तम व्यासपीठ उपलब्ध होते.तर मुख्याध्यापिका अनिता शेळके यांनी स्पर्धेचे महत्त्व अधोरेखित करताना नमूद केले. आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांची भाषणकला, नेतृत्वगुण आणि विचारशक्ती विकसित होते. कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिकेच्या पुढाकारामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना मोठी संधी मिळाली आहे. या उपक्रमामुळे रायगड जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास लक्षणीयरीत्या वाढला असून त्यांच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा खारघर महासचिव दीपक शिंदे, महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, उत्तर रायगड सचिव ब्रिजेश पटेल, खारघर उपाध्यक्ष किरण पाटील, अजित अडसुळे, सुरेश ठाकूर, दत्ता ठाकूर, अजय माळी, अश्विनी भुवड, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, युवा मोर्चा उपाध्यक्ष प्रवीण बेरा, सचिव आदित्य हाटगे, योगेश पाटील, मयूर घरत, यश पवार, अनिकेत पाटील, बंटी ढाकसे आदी उपस्थित होते.

# सत्काराला फाटा देत 'लांडगे व बेरड परिवाराचा' अनोखा उपक्रम

## बारा शाळांना देणगी देऊन सामाजिक संवेदनशीलतेचा नवा पायंडा

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी (बाळासाहेब रकटाटे)** :लग्नसोहळ्यांमध्ये मानपान, फेटे, सत्कार यावर मोठ्या प्रमाणात खर्च होतो. काही वेळातच हे सन्मानाचे फेटे व सामग्री बाजूला पडून त्याचा प्रत्यक्ष फायदा न दिसणं ही सर्वसामान्य बाब आहे. हीच जाणीव लक्षात घेऊन गौखेल येथील प्राथमिक शिक्षक सुभाष लांडगे यांनी आपल्या मुलाच्या विवाहप्रसंगी खर्चाला योग्य दिशा देत समाजात कौतुकास्पद आदर्श ठेवला आहे.

लग्नातील सत्काराचा सगळा खर्च वगळत लांडगे कुटुंबाने बारा शाळांना रोख देणगी देऊन शिक्षणासाठी संवेदनशील भूमिका घेतली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक



उन्नतीसाठी ही देणगी उपयुक्त ठरणार असल्याने ग्रामस्थांमध्ये या उपक्रमाचे व्यापक कौतुक होत आहे.देणगी मिळालेल्या शाळा, वृद्धेश्वर विद्यालय गौखेल, प्राथमिक शाळा गौखेल, प्राथमिक शाळा लमाणतांडा (गौ.) प्राथमिक शाळा कारखेल बु.प्राथमिक शाळा बर्डे वस्ती, प्राथमिक शाळा मसोबावाडी, प्राथमिक शाळा अंभोरा, प्राथमिक शाळा सावरगाव, आडबगीनाथ विद्यालय कारखेल बु., प्राथमिक शाळा अरणविहीरा इत्यादी शाळांना या विवाहप्रसंगी रोख स्वरूपात देणगी देण्यात आली.

**बेरड कुटुंबाचीही सहभागी देणगी**

विवाह हा फक्त आनंदाचा क्षण नसून समाजोपयोगी कार्य करण्याचेही एक व्यासपीठ बनू शकतो, हे लक्षात घेऊन बेरड कुटुंबानेही सहकार्याची भूमिका घेतली.संदीप बेरड पाटील यांच्या वतीने माध्यमिक शाळेसाठी तसेच मंदिरासाठी देणगी देऊन या उपक्रमाला अधिक सर्वसमावेशक रूप मिळाले.

**समाजासाठी प्रेरणादायी संदेश**

अनावश्यक खर्च टाळून शिक्षणासाठी मदतीचा हात पुढे करणारा हा प्रयत्न समाजात सकारात्मक बदल घडवणारा आहे.

लांडगे व बेरड कुटुंबांनी उभा केलेला हा आदर्श भविष्यात इतरांसाठी मार्गदर्शक ठरेल, असे उद्गार याप्रसंगी बोलताना बीड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण सभापती उद्धव बापू दरेकर यांनी काढले.

# शाहीर जयंत चव्हाण (बापू) कलगी तुरा शाहिरी पुरस्कार २०२५ ने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (शांताराम गुडेकर)** : बालपणापासून गायन व संगीताची आवड असल्याने रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यामधील देवरुख शहरापासून जवळच असलेल्या निवे खुर्द येथील शाहीर जयंत राजाराम चव्हाण( उर्फ बापू) यांनी वयाच्या १७ व्या वर्षी गुरुवर्य शिवशाहीर विठोबा साळवी रा. खेड यांच्या मार्गदर्शनाखाली , कोकणातील प्रसिद्ध लोककला जाखडी, नमन या क्षेत्रात पहीले पाऊल ठेवले आणि यशस्वीपणे गेली ४०वर्ष ही कला जोपासत आहेत.कलगीतुरा समन्वय समिती संगमेश्वर देवरुखचे गेली २५ वर्ष ते उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सांभाळत आहेत.सामाजिक,क्षेत्रात ही बापू अग्रेसर आहेत.त्यांच्या या कार्याची दखल घेत कलगी तुरा लोककला संवर्धनपर अविरत कार्यरत असणारी कलगी तुरा समाज उन्नती मंडळ मुंबई-(महाराष्ट्र राज्य) संस्थेच्या वतीने कलगी तुरा शाहीर पुरस्कार-२०२५ देऊन गौरव करण्यात आला.

कोकणातील लोककला आणि लोककलावंतांसाठी सातत्याने सक्रीय असणारे एक बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणून सर्वांना



परिचित असणारे शाहीर जयंत चव्हाण (बापू) यांना नुकताच भारतरत्न लताताई मंगेशकर नाट्यगृह, मीरारोड (पूर्व) मुंबई येथे संपन्न झालेल्या बहारदार पुरस्कार वितरण सोहळयात 'कलगी तुरा शाहिरी पुरस्कार २०२५' मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. कलगी तुरा या कोकणच्या लोककलेच्या जतन आणि संवर्धनासाठी गेली ६५ वर्षे कार्यान्वीत असलेली नोंदणीकृत संस्था म्हणजे कलगीतुरा समाज उन्नती मंडळ, मुंबईतर्फे हा गौरव करण्यात आला.

कोकणातील नामवंत शाहिरांचा तसेच आयोजक व काही पत्रकारिता क्षेत्रातील व्यक्तिमत्त्वांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.शाहीर जयंत चव्हाण (बापू) यांचे लोककलेतील योगदान सर्वश्रुत आहे.शाहीर जयंत चव्हाण यांना आजवर अनेक पुरस्कारांनी वेगवेगळया संस्था आणि संघटनांनी सन्मानित केले आहे.परंतु सदरचा पुरस्कार कलगी तुरा या लोककलेतील मातृसंस्था समजल्या जाणाऱ्या संस्थेने दिलेला पुरस्कार हा आपल्यासाठी विशेष असल्याचे शाहीर जयंत चव्हाण यांनी पत्रकार मंडळीशी बोलताना मत व्यक्त केले.पुरस्कार वितरण प्रसंगी सामाजिक, राजकीय तसेच लोककला क्षेत्रातील दिग्गज व्यक्तिमत्वाची उपस्थिती लाभली होती.

काही दिवसांपूर्वीच मा.माजी आमदार सुभाषजी बने साहेब यांनी त्यांच्या नावाची शिफारस केली.त्यानुसार रत्नागिरी जिल्हा पालकमंत्री महोदय यांनी मंजूरी देत राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजना समिती(जिल्हा रत्नागिरी)मध्ये शाहीर जयंत राजाराम चव्हाण( उर्फ बापू) यांची सदस्य पदी निवड करण्यात आली आहे.संगमेश्वर तालुक्यातील सर्व कलेतील कलावंतांना याचा निश्चित पणे फायदा होणार आहे.त्यांची नियुक्ती तसेच कलगी तुरा शाहीर पुरस्कार-२०२५ हा मानाचा पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे संगमेश्वर तालुक्यातून शाहीर बापू चव्हाण यांच्या वर कलावंताकडून तसेच मित्र परिवाराकडून अभिनंदन सह शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# जाफराबादमध्ये रेती तस्करांवर सर्जिकल स्ट्राईक'; दीड कोटीचे ५ टिप्पर जप्त

## मध्यरात्रीच्या थरारात पोलीस-महसूलचा संयुक्त 'दणका'; वाळूमाफियांचे धाबे दणाणले

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद टेंभूर्णी प्रतिनिधी -अनिल ससाने** : जाफराबाद तालुक्यातील मौजे निमखेडा शिचारात ८ डिसेंबरच्या मध्यरात्री महसूल आणि पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे कोम्बिंग ऑपरेशन' राबवले. पूर्णा नदीपात्रातून अवैधरीत्या वाळू उपसा करणारे ५ हायवा टिप्पर



> "अवैध वाळू वाहतुकीवर आम्ही शून्य सहनशिलतेची भूमिका घेतलेली आहे काल मध्यरात्री धाड टाकून पाच टिप्पर पथकांना ताब्यात घेण्याची यश आले वाळू उपशामुळे होणारी पर्यावरणाची हानी आणि कायद्याची पायमल्ली खपवून घेतली जाणार नाही जाफराबाद पोलीस सदैव सज्ज आहे"
>
> -एस.एस. जाधव, पोलीस निरीक्षक जाफराबाद

> "अवैध वाळू उत्खननविरुद्ध महसूल विभाग कठोर भूमिकेत आहे दोन दिवसापूर्वी दोन टिप्परवर कारवाई केली होती तर काल मध्यरात्री संयुक्त मोहिमेत आणखी ५ टिप्पर ताब्यात घेण्यात आली आहेत ही कारवाई अत्यंत महत्वाची असून जप्त मुद्देमालाची किंमत दीड कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे अशा कारवाया सातत्याने सुरू राहतील
>
> -डॉ. सारिका भगत, तहसीलदार जाफराबाद

जागीच पकडून प्रशासनाने वाळू तस्करांना जोरदार दणका दिला आहे. या ढक कारवाईत सुमारे दीड कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याने अवैध व्यवसायिकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

मध्यरात्री दोन वाजता कारवाईचा थरार जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार डॉ. सारिका भगत व पोलीस निरीक्षक एस.एस. जाधव यांनी या धडक मोहीमेचे नेतृत्व केले. निमखेडा शिवारातील पूर्णा नदीपात्रात वाळूमाफियांचा सुळसुळाट सुरू असल्याची गुप्त माहिती पथकालामिळाली होती. क्षण्णाचाही विलंब न लावता ए.पी.आय. सुनीलचव्हाण, पो.कॉ. भागीले आणि तपास अधिकारी अनंता डोईफोडेयांच्या पथकाने मध्यरात्री २ वाजता नदीपाजाला घेराव घातला

अत्यंत जोखमीच्या या मोहिमेत वाळूने खच्चून भरलेले ५ टिप्पर रंगेहाथ पकडण्यात प्रशासनाला यश आले. कारवाईदरम्मान वाहनांसह सुमारे दीड कोटी रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, सर्व वाहने जाफराबाद पोलीस ठाण्यात जमा करण्यात आली आहेत. अलीकडच्या काळातील ही सर्यात मोठी कारवाई मानली जात आहे.

**नागरिकांना आव्हान**

अवैध वाळू उपशामुळे नदीपात्राची होणारी हानी आणि पर्यावरणाचा ह्यास रोखण्यासाठी प्रशासनाने झिरो टॉलरन्स धोरण धोरण अवलंबले आहे या कारवाईमुळे वाळू तस्करांचे धाबे दणालेले असून गुन्हेगारी वर्तुळात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे नागरिकांनी अशा बेकायदेशीर प्रकाराचे माहिती निर्भुळपणे प्रशासनाला द्यावी अशी आवाहन करण्यात आले आहे

# शांती कंट्रक्शने महानगरपालिका एन वॉर्ड ची फसवणूक करून निधी लाटला?

## मनपा एन विभाग सहाय्यक आयुक्तांची भूमिका संशयास्पद ? - प्रशांत मुके

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर (केतन भोज)** : मनपा एन विभागातील प्रभाग क्रमांक १२३,१२४,१२७,१२८ या चारही प्रभागात मागील सन २०२३-२४ आणि २०२४-२५ या कालावधीत शांती कंट्रक्शन यांनी एकूण ३९ कामे घेतली होती.परंतु यातील काही कामे ही प्रत्यक्षात त्या- त्या ठिकाणी पूर्ण झालेली नाहीत ? तसेच याबाबतचे संबंधित सर्व पुरावे आमच्याकडे उपलब्ध आहेत असे प्रहार जनशक्ती पक्षाचे घाटकोपर विधानसभा अध्यक्ष प्रशांत मुके तसेच स्थानिक सामाजिक कार्यकर्ते प्रमोद खेडेकर यांचे म्हणणे आहे. स्थापत्य दुरुस्तीच्या नावाखाली फक्त कागदावर ही कामे दाखवून सदर कामांचा निधी शांती कंट्रक्शन या कंपनीने लाटला आहे ? तसेच या सर्व कामांचा एकूण निधी रु.७.३९.१२.१००/- इतका होत आहे.तसेच या सर्व प्रकरणात मनपा एन विभागातील परिरक्षण विभागातील संबंधित अधिकारी यांनी शांती कंट्रक्शन यांनी जागेवर त्याठिकाणी प्रत्यक्षात कामे पूर्ण केली आहेत की नाही ? यांची कामाच्या ठिकाणी जाऊन पाहणी निरीक्षण ही न करता निधी कसा काय वितरित केला ? तर हा मग भ्रष्टाचारच आहे ? तसेच याबाबत स्थानिक सामाजिक कार्यकर्ते प्रमोद खेडेकर यांनी मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त गजानन बेल्लाळे तसेच परिरक्षण विभागाचे सहाय्यक अभियंता सचिन खजुरे यांच्याकडे शांती कंट्रक्शन यांनी घेतलेल्या कामांची प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन पाहणी निरीक्षण करण्याची मागणी केली असता त्यांच्याकडून ही यावर अद्याप ही कोणत्याही प्रकारची कार्यवाही होताना दिसत नसून,त्यामुळे शांती कंट्रक्शन या कंपनीला संबंधित मनपा एन विभाग परिरक्षण विभागातील अधिकारी सहकार्य करून शांती कंट्रक्शन या कंपनीला याठिकाणी पाठीशी घालत आहे हे दिसून येत आहे ? तसेच या सर्व प्रकरणाचा मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त गजानन बेल्लाळे यांनी लवकरात लवकर खुलासा करून संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी प्रहारचे प्रशांत मुके आणि प्रमोद खेडेकर यांनी एन विभागाचे सहाय्यक आयुक्त गजानन बेल्लाळे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केली असता मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त हे या सर्व प्रकरणी कोणत्याही प्रकारची कारवाई करताना दिसत नसून सहाय्यक आयुक्त गजानन बेल्लाळे यांची भूमिका संशयास्पद असल्याचे दिसत आहे ? असे प्रहार जनशक्ती पक्षाचे घाटकोपर विधानसभा अध्यक्ष प्रशांत मुके तसेच स्थानिक सामाजिक कार्यकर्ते प्रमोद खेडेकर यांचे म्हणणे असून यावर संबंधित एन विभाग प्रशासनाकडून कारवाई होत नसल्यास लवकरच आम्ही या सर्व भोंगळ कारभाराविरुद्ध आंदोलन उभे करून आवाज उठवू तसेच पुढ पर्यंत आम्ही हा विषय लावून धरून या सर्व प्रकरणी वरिष्ठ प्रशासनाला कारवाई करण्यास भाग पाडू असे प्रहार जनशक्ती पक्षाचे घाटकोपर विधानसभा अध्यक्ष प्रशांत मुके तसेच स्थानिक सामाजिक कार्यकर्ते प्रमोद खेडेकर यांनी सांगितले.

# श्रीवर्धन – चाकरमान्यांची गैरसोय कायम; ST डेपोच्या मनमानी कारभारावर वाढत नाराजी

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित :** श्रीवर्धन परिसरातील मोठ्या प्रमाणातील चाकरमानी मुंबई, पनवेल, ठाणे अशा ठिकाणी नोकरीसाठी जातात. प्रवासासाठी राज्य परिवहन महामंडळाची (ST) बस हीच त्यांची प्रमुख आणि विश्वासार्ह सोय आहे. मात्र, श्रीवर्धन ST डेपोच्या मनमानी व निष्काळजी कारभारामुळे या चाकरमान्यांना प्रचंड गैरसोय सहन करावी लागत आहे.

मुंबईकडे जाणाऱ्या बसेस चालक–वाहक नाहीत, गाडी उपलब्ध नाही, तांत्रिक बिघाड, अशा कारणांखाली अनेक वेळा अचानक रद्द केल्या जातात. परिणामी चाकरमान्यांना नोकरीच्या ठिकाणी वेळेत पोहोचणे अवघड बनले असून, काहींना महागडी खाजगी वाहतूक पकडण्याची वेळ येते. विशेष म्हणजे—जनतेसाठी अत्यावश्यक असलेल्या या मार्गावरील बसेस बंद राहतात, पण डेपो कर्मचाऱ्यांच्या सोयीच्या मार्गावरील बसेस मात्र कधीच रद्द होत नाहीत, अशी नागरिकांची तक्रार आहे.

याचबरोबर आणखी एक गंभीर समस्या म्हणजे ST बसेसची देखभाल पूर्णपणे ढासळली आहे. अनेक बस प्रवासादरम्यानच वाटेत बंद पडतात, त्यामुळे प्रवाशांना रस्त्यावर अडकून पडणे, तासन्तास प्रतीक्षा करणे, किंवा पर्यायी वाहन शोधण्यासाठी धावपळ करणे भाग पडते.




बसची वेळीच सर्व्हिसिंग, देखभाल आणि तपासणी याबाबत वारंवार मागणी करण्यात येत असतानाही, डेपो प्रशासनाकडून त्या दिशेने कोणतीही ठोस पावले उचलली जात नाहीत, अशी नागरिकांची नाराजी आहे.चालक–वाहकांचा अभाव, गाड्यांची कमतरता, आणि देखभालीचा प्रश्न सोडवण्याऐवजी फक्त कारणांची पुनरावृत्ती केली जात असल्याने चाकरमान्यांच्या सहनशीलतेचा बांध फुटू लागला आहे.नागरिकांचे मत स्पष्ट आहे —"दररोज हजारो लोकांच्या उपजीविकेशी संबंधित असलेल्या प्रवासाची ही समस्या आहे. त्यामुळे बहाणे नकोत, बसची नियमित देखभाल, कर्मचारी उपलब्धता आणि बससेवा सुरळीत ठेवण्यासाठी तातडीच्या उपाययोजना हव्यात."श्रीवर्धनमध्ये ST सेवांवरील विश्वास पुन्हा निर्माण करायचा असेल, तर प्रशासनाने आता तरी हा प्रश्न गंभीरतेने घेत त्वरित कारवाई करणे अत्यावश्यक झाले आहे.

# नैसर्गिक प्रकोपातून वाचलेली मका झाली कवडीमोल

## बळीराजाला दुहेरी फटका, शासनाच्या हस्तक्षेपाची मागणी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/योगेश पालोदकर सिल्लोड :** एका बाजूला अवकाळी पावसाने हातातोंडाशी आलेले पीक हिरावून घेतले असताना, दुसरीकडे निसर्गाच्या या प्रकोपातून कशीबशी वाचलेली मका आता बाजारभावात अक्षरशः मातीमोल दराने विकावी लागत असल्याने सिल्लोड तालुक्यातील शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. नैसर्गिक आपत्तीनंतर बाजारभावात झालेली ही घसरण शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत असून, या 'कवडीमोल' दरामुळे शेतकऱ्यांच्या पदरात निराशाच पडल्याने शासनाने तातडीने हस्तक्षेप करून दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

यावर्षी सिल्लोड तालुक्यात अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने मका



पिकाची लागवड केली होती. मात्र, ऐन काढणीच्या वेळी झालेल्या अवकाळी पावसाने मोठे नुकसान केले. अनेक शेतांमध्ये मका भिजून कणसांना कोंब फुटले, परिणामी पीकाची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात खालावली. या नैसर्गिक संकटातून ज्या शेतकऱ्यांनी हिंमतीने आपली मका वाचवली, सुकवून बाजारात आणली, त्यांनाही आता न परवडणाऱ्या दरांचा सामना करावा लागत आहे.

सध्या स्थानिक बाजारात मक्याला केवळ ₹१२०० ते ₹१४०० प्रति क्विंटल असा दर मिळत आहे. हा दर मका उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी असून, बियाणे, खते, मजुरी आणि नैसर्गिक आपत्तीनंतर पीक वाचवण्यासाठी केलेली धडपड याचा वाढलेला खर्च पाहता, सध्याचा बाजारभाव शेतकऱ्यांची केवळ थट्टा करणारा आहे.

एका हवालदिल शेतकऱ्याने आपली व्यथा मांडताना सांगितले की, "उत्पादन खर्च वाढला, त्यात अवकाळी पावसाने मक्याची गुणवत्ता घटली. आता बाजारभाव पडल्यामुळे हाती काहीच लागत नाहीये. काही क्विंटल मका वाचली, पण त्यातून तोडणी आणि वाहतुकीचा खर्चही निघणे कठीण झाले आहे. मका पिकवूनही कर्ज फेडता येणार की नाही याची चिंता आहे."

अनेक शेतकरी ट्रॅक्टर आणि थ्रेशरच्या सहाय्याने शेतातच मक्याची काढणी करत असले तरी, हे कवडीमोल भाव त्यांना आर्थिक गणित जुळवू देत नाहीत.

शेतकरी संघटना आणि लोकप्रतिनिधींनी या परिस्थितीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. एकीकडे नैसर्गिक आपत्ती आणि दुसरीकडे बाजारपेठेतील घसरण अशा दुहेरी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याची भावना शेतकरी वर्गात वाढीस लागली आहे.

शेतकऱ्यांनी आता मक्याला उत्पादन खर्चावर आधारित किमान आधारभूत किंमत मिळवून देण्यासाठी शासनाने हस्तक्षेप करावा, अशी मागणी होत आहे.

नैसर्गिक संकटात सापडलेल्या बळीराजाला सावरण्यासाठी सरकारने संवेदनशीलतेने पाऊल उचलणे गरजेचे आहे. अन्यथा, हा मातीमोल बाजारभाव शेतकऱ्याला मोठ्या आर्थिक संकटात लोटणार, यात शंका नाही.

# माणगांव येथे प्रथमच विविध सांस्कृतिक कार्यक्रमासह भव्य असे कोकण फेस्टिव्हल- 2025 चे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी (सचिन पवार) माणगांव रायगड** : आपल्या कोकणाचे मुख्य प्रवेशद्वार रायगडचे मध्यवर्ती ठिकाण *माणगांव* येथे शुक्रवार दिनांक 12 ते सोमवार दिनांक 22 डिसेंबर 2025 पर्यंत विविध खाद्य पदार्थ, विविध खाद्य पदार्थ आणि भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानीचा आनंद माणगांवसह, रायगड, कोकण आणि महाराष्ट्रातील असंख्य प्रेषकांच्या उपस्थित संपन्न होणार आहे.

शुक्रवार दिनांक 12 डिसेंबर 2025 रोजी सांय ठिक 6.00 वाजता ढोल-ताशा पथकसह ग्रंड लेवला उद्घाटन होणार आहे. सदर उद्घाटन समारंभसाठी प्रमुख पाहुणे आणि सेलिब्रेटी गेस्ट म्हणून सुप्रसिद्ध जेष्ठ अभिनेत्री तसेच माहेची साडी फेम *मा.सौ. अलकाताई कुबल- आठले*, चला हवा येवु फेम




आणि सुप्रसिद्ध निवेदक, लेखक, दिग्दर्शक *मा.श्री. डॉ. निळेश साबळे सर,* अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष *मा.श्री. मेघराज राजे भोसळे साहेब*, माणगांवचे शिक्षण सम्राट व प्रमुख नेते *अँड. राजीवजी साबळे साहेब*, नगराध्यक्ष *मा.श्रीमती.शर्मीला सुर्वे मॅडम*, माजी नगराध्यक्ष तसेच माणगांवचे प्रांत साहेब, तहसीलदार साहेब, मुख्याधिकारी सर, गट विकास अधिकारी मॅडम, माणगांव न्यायालयातील न्यायाधीश साहेब सह माणगांव मधील अनेक व सर्व श्रेत्रांतील प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सदर कार्यक्रमात माणगांव, रायगड, कोकण सह महाराष्ट्रातील विविध श्रेत्रांतील उल्लेखनीय काम करणा-या असामान्य व्यक्तिमत्त्वाचा विशेष सन्मान प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते केला जाणार आहे. सदर फेस्टिव्हल मध्ये शाळा व कॉलेजमधील विद्यार्थांचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम, शॉर्टफिल्म फेस्टिव्हल, काव्य वाचन, गीत गायन, अभिनय स्पर्धा, लावण्यवती स्वाती पुणेकर यांचा लावणी महोत्सव कार्यक्रम, बॉडी बिल्डींग, रेकॉर्ड डान्स आणि खास कोकण सुंदरी अशा अनेक स्पर्धा तसेच 14 भाषेत आणि 4500 हुन जास्त विक्रमी प्रयोग केलेला कौटुंबिक विनोदी नाटक *ऑंद द बेस्ट*, तसेच महाराष्ट्राचा सुपरस्टार आणि हास्य टॉनिक भाऊ कदम यांचा *सिरीयल किल्लर* हा धमाल कौटुंबिक विनोदी नाटकसह अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमाची अस्सल मेजवाणी खास दर्दी व हौशी रसिक प्रेक्षकांना पाहावयास मिळणार आहे.

तरी माणगांवात प्रथमच होणा-या या *कोकण फेस्टिव्हल- 2025* च्या उद्घाटन सोहळयास शुक्रवार दिनांक 12 डिसेंबर 2025 रोजी सांय ठिक 6.00 वाजता महाराष्ट्रसह खाह *कोकणातील* सर्व प्रेक्षकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन *रायगड सांस्कृतिक कला मंडळ, महाराष्ट्र राज्य* सांस्कृतिक नातं जपणार व्यासपीठचे निमंत्रक व संस्थापक- अध्यक्ष डॉ. अजय आत्माराम मोरे आणि सेक्रेटरी सौ. अंकीता अजय मोरे तसेच कार्याध्यक्ष सौ. प्रमिला हितेनभाई छेडा व सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.

# वीर वाजेकर महाविद्यालयात ' आपत्ती व्यवस्थापन बेसिक कोर्स चे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**कॉलेज कट्टा/आरती सुरवसे** : उरण-फुंडे येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात 'आपत्ती व्यवस्थापन पाच दिवसीय बेसिक ट्रेनिंग कोर्स चे आयोजन केले . उद्घाटनास प्रमुख वक्ते श्री शशिकांत शिरसाट सहायक उप नियंत्रक, नागरी संरक्षण दल, उरण हे होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर होते. उरण सारख्या औद्योगिक परिसरात आपत्तीला सामोरे जाण्यासाठी तरुण पिढी प्रशिक्षित असणे अत्यन्त गरजेचे आहे व विद्यार्थ्यांनी ह्या कार्यशाळेचा उपयोग आपत्ती च्या प्रसंगी करून कमीत कमी जीवित हानी होईल असे प्रयत्न करावेत असे आव्हान केले. शशिकांत शिरसाट यांनी सदर बेसिक कोर्स मध्ये नी आपत्ती म्हणजे काय, आपत्ति चे प्रकार ह्याची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना करून आपत्ती च्या वेळेस जखमींना कसे प्रथमोपचार द्यायचे, त्यांच्या जखमेवर ड्रेसिंग कसे करायचे,त्यांना सुरक्षित ठिकाणी किंवा दवाखान्यात कसे न्यायचे, स्ट्रेचर नसल्यास




घरगुती साहित्यातून स्ट्रेचर कसे बनवायचे व जखमींना घेऊन जायचे, जखमी व्यक्तीला कसे उचलायचे ह्या सर्व प्रकारांची प्रात्यक्षिक दाखवून विध्यार्थ्यांकडून सराव करून घेतला जाणार आहे.पूर परिस्थिती मध्ये आपण आपले व दुसऱ्यांचे जीव घरघुती वस्तूंचा वापर करून कसे वाचवू शकतो ह्याची माहिती दिली जाणार आहे. त्याच प्रमाणे आपत्तीच्या वेळेस जीव गुदमरला असेल किंवा व्यक्ती बेशुद्ध असेल किंवा ह्दयाचा झटका आला असल्यास काय उपाय योजना करायची कसा प्रथमोपचार करायचा ह्याचीही सविस्तर माहीती प्रत्यक्षिकासहीत माहिती करून दिली जाते.कार्यशाळेचे प्रास्तविक प्रा. डॉ. गिरीष गुंड कार्यशाळेचे समनव्यक ह्यांनी केले. उद्घाटन प्रसंगी प्रा. डॉ. अनिल पालवे, प्रा.डॉ. राहुल पाटील, सुयशा पाटील मॅडम, डॉ. धरती घरत मॅडम उपस्थित होते.

# डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांची विशेष शाळा,व निपिड तर्फे युनिफाईड गेम्सचा कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : जागतिक दिव्यांग सप्ताह निमित्त शाळेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.दि. 05/12/25 रोजी स्मार्ट एज्युकेशन अकॅडमी पनवेल व डॉ. एन.एम. जाधव फाउंडेशन संचलित बौद्धिक अक्षम मुलांची विशेष शाळा यांच्यामध्ये युनिफाईड गेम्स चे आयोजन करण्यात आले होते. सामान्य शाळेतील विद्यार्थी व विशेष शाळेतील विद्यार्थी यांनी एकमेकांच्या सोबत क्रीडा स्पर्धेत सहभागी होणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. रनिंग,सॉफ्टबॉल थ्रो, स्टँडिंग जम्प हे क्रीडा प्रकार दोन्ही शाळेच्या विद्यार्थ्यां सोबत एकत्रित रित्या घेण्यात आले. यामध्ये कधी सामान्य शाळेतील विद्यार्थी जिंकत होते तर कधी बौद्धिक अक्षम शाळेतील विद्यार्थी जिंकत होते.आणि एकमेकांच्या साथीने चुरस खूपच वाढत होती.विद्यार्थी खेळायचा आनंद लुटत होते. एक प्रकारे समावेशनाच्या दिशेने हे पाऊल म्हणावे लागेल. या कार्यक्रमात




स्मार्ट एज्युकेशन अकॅडमीच्या ट्रस्टी व मुख्याध्यापिका सहभागी झाले होते. त्यांनी यूनियफाईड गेम्सचे आयोजन केल्याबद्दल शाळेचे आभार मानले. तसेच विद्यार्थ्यांचे क्रीडा कौशल्य शिक्षकांची मेहनत यांचे भरभरून कौतुक केले . सर्व कार्यक्रमाचे कौतुक करत शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. श्रेया जाधव यांचे या कार्यक्रमासाठी आमंत्रित केल्याबद्दल आभार मानले.

दि. 05/12/25 रोजी निपिड आयोजित एबिलिटी मेला मध्ये व्यावसायिक वस्तू व विक्री करण्यासाठी शाळेतील शिक्षक व शाळेतील व्यावसायिक वर्गातील विद्यार्थी सहभागी झाले होते. स्टॉल वर आलेल्या लोकांनी बनविलेल्या वस्तूंचे कौतुक केले. जागतिक दिव्यांग सप्ताहनिमित्त आयोजित केलेल्या यूनियफाईड गेम्स या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्यला वाव देणे.सामान्य शाळा व विशेष शाळा यांच्या एकत्रित रित्या गेम्स घेउन् समावेशनाच्या दिशेकडे वाटचाल करणे. व्यावसायिक प्रदर्शन व विक्री अबिलीटी मेला मध्ये सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या आत्मनिर्भरते कडे वाटचाल करणे हे या कार्यक्रमांच्या आयोजना मागचा शाळेचा उद्देश होता.

# मुळावा बस्थानक परिसरात घाणीमुळे प्रवाशी आणि विद्यार्थी त्रस्त

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजु गायकवाड(मोहदरी ) :** मुळावा बस्थानक परिसरात हॉटेलधारकांच्या निष्काळजीपणामुळे अक्षरशः घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर संकट ओढवले आहे. बस्थानकाजवळील काही हॉटेलधारक नाल्यांतील घाण, बेंदाड आणि स्वयंपाकघरातील कचरा सर्रासपणे मुख्य शे. पिंपरी–उमरखेड राज्य मार्गावर टाकत आहेत. त्यातच वार्ड क्रमांक दोनमधील मोठी सांडपाण्याची नाली अनेक वर्षांपासून बंद पडलेली असून तिचे सांडपाणी दिवसभर रस्त्यावर वाहत असल्याने परिस्थिती अधिकच भयावह झाली आहे.या घाणीमुळे रस्त्यावरून ये-जा करणारे नागरिक, बस्थानकावर येणारे ग्रामीण भागातील प्रवासी, तसेच बस्थानकालगत असलेल्या श्री शिवाजी विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. विद्यार्थी दररोज या नाल्यातील घाणीच्या पाण्यातून चालत शाळेत जात असून त्यांच्या पायांवर हीच घाण घेऊन ते वर्गात पोहोचतात. वाहतुकीदरम्यान वाहनांच्या चाकांमुळे उडणाऱ्या पाण्याचा फटका थेट नागरिकांच्या अंगावर बसत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार हॉटेलधारकांकडून सुरू असलेल्या कचरा व सांडपाणी टाकण्याच्या प्रकारांवर ग्रामपंचायत आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अजूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.

विशेष म्हणजे या हॉटेलांनी केलेले अतिक्रमण ग्रामपंचायत व पीडब्ल्यूडीच्या संयुक्त मालकीच्या जागेत असल्याने दोन्ही विभागांनी

**बस्थानक लगतच आमच्या शाळेचा मुख्य प्रवेश दार व तीन ते चार हॉटेल सुद्धा आहे.हे हॉटेल धारक दररोज नाली सफकरुन रस्त्यातच घाण टाकतात त्यामुळे विध्यार्थ्यांचे अपघात होऊशकतो व आरोग्याला सुद्धा धोका निर्माण झाला आहे.**

**- नारायण धबडगे,मुख्याध्यापक श्री शिवाजी विद्यालय मुळावा**

तातडीने संयुक्त कारवाई करून रस्ता रुंद करावा व अतिक्रमण हटवावे, अशी जोरदार मागणी मुळावा वासीयांनी केली आहे.

घाणीच्या या वाढत्या साम्राज्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गदा येण्यापूर्वी प्रशासनाने जागे होऊन कठोर पावले उचलण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# वीज कामगार संघटनांचा आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : गेल्या शंभर वर्षांपासून बेस्ट उपक्रमाचा विज पुरवठा मुंबईत सुरू आहे.आशिया खंडात या वीज उपक्रमाचे नाव गौरविले गेले आहे. मात्र आता धारावी सारख्या भागात अदानी कंपनी शिरकाव करण्याच्या हालचाली सुरू आहेत. त्यामुळे आम्ही आंदोलन करून जनतेला व कामगारांना न्याय देणार असल्याची माहिती मुंबई इलेक्ट्रिक वर्कर्स युनियनचे सरचिटणीस विठ्ठलराव गायकवाड यांनी मुंबई मराठी




पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी युनियनचे अध्यक्ष अशोक चव्हाण, मसु ढवळे ,अतिरिक्त सरचिटणीस पवन गायकवाड, आम आदमी पार्टी मुंबई प्रदेश समिती प्रणाली राऊत उपस्थित होते.बेस्ट उपक्रम स्थानिक स्वराज्य संस्थे अंतर्गत असल्याने विद्युत कायदा २००३ च्या कलम १४ अन्वये त्याच्या परवाना क्षेत्रात कोणतीही स्पर्धा लागू होत नाही. त्यामुळे या क्षेत्रात खाजगी कंपनीला परवाना देणे बेकायदेशीर असल्याचा आरोप गायकवाड यांनी केला आहे. अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई कंपनीने त्यांच्या वितरण परवान्यात सुधारणा करून धारावीचा समावेश करण्यासाठी महाराष्ट्र विज नियामक आयोगाकडे अर्ज केला आहे. या प्रस्तावावर दैनिक लोकसत्तामध्ये सूचना प्रसिद्ध झाल्यानंतर बेस्ट विज कामगारांनी व समर्थकांनी तीव्र हरकती दाखल केल्या आहेत.

कामगार संघटनांचे म्हणणे आहे की अदाणी कंपनीकडे कामगार कपात, कंत्राटी पद्धती, वेतन करार प्रलंबित ठेवणे, न्यायालयीन दंड अशा अनेक बाबतींत आंधळा कारभार आहे. त्यामुळे अशा कंपनीला धारावीचा विज पुरवठा देणे धोकादायक ठरेल. या पार्श्वभूमीवर सरकारने कोणताही निर्णय न घेतल्यास झाल्यास जन आंदोलन करण्याचा इशारा गायकवाड यांनी यावेळी दिला.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# ईव्हीएम व स्ट्राँगरूमवर जगता पहारा!; उरण नगरपालिकेत निवडणूक साहित्य सुरक्षिततेसाठी युद्धसज्ज बंदोबस्त

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** उरण नगरपालिका निवडणुकीचा ताप वाढत असताना ईव्हीएम मशिन्स व मतपेट्या ठेवण्यात आलेल्या स्ट्राँगरूमवर सुरक्षतेचे लोखंडी कवच चढविण्यात आलेआहे. प्रशासकीय भवनातील सभागृहासह नगरपालिका कार्यालय परिसरात पोलिसांनी अक्षरशः कडेकोट बंदोबस्त उभा करत 'नो-एरर झोन' घोषित केला आहे. निवडणूक प्रक्रियेत कुठलाही संशयास्पद हालचाल, हस्तक्षेप किंवा गोंधळ होऊ नये म्हणून प्रशासन कोठलीही जोखीम घ्यायला तयार नाही. संपूर्ण परिसरात दिवसरात्र पोलिसांचा तगडा फौजफाटा तैनात असून प्रवेशद्वारावर कडक तपासणी सुरू आहे. सुरक्षा रिंगणात असलेल्या अधिकाऱ्यांनी स्ट्राँगरूमची पाहणी करत सर्व यंत्रणाना सतत सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. प्रशासकीय अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी स्ट्राँगरूममधील ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशिन्सची प्रत्यक्ष पाहणी करत परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण केलेआहे. कोणताही दोष, गडबड किंवा शंका राहू नये म्हणून सुरक्षा तपासण्या वारंवार केल्या जात



आहेत. स्ट्राँगरूम परिसरात 24तास सीसीटीव्ही देखरेख, आधुनिक अलार्म सिस्टम, ड्युअल लॉकिंग सिस्टीम व तांत्रिक निगराणी बसवण्यात आली आहे. अग्निशमन दलालाही सतर्क राहण्याच्या सूचना देत संपूर्ण परिसरात अग्निसुरक्षेची व्यवस्था उभारण्यात आली आहे. निवडणूक साहित्य ठेवण्यात आलेल्या उरण नगरपालिका कार्यालयालाही हाय-रिस्क झोन घोषित करून अतिरिक्त पोलिस बळ तैनात केले आहे. मतपेट्या, ईव्हीएम व संवेदनशील कागदपत्रांवर कुठल्याही परिस्थितीत सावली येऊ नये यासाठी प्रशासनाने पाऊलं टोकावर आणली आहेत. उरणमध्ये राजकीय वातावरण तापले असताना, सुरक्षेचा हा कडेकोट आवरण पाहता यंदाची निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, कठोर व शून्य-तडजोडीच्या भूमिकेतून पार पाडण्याचा प्रशासनाचा निर्धार स्पष्ट दिसत आहे.

# खारघरमध्ये इलेक्ट्रिक बस सेवा ठप्प

## शिव सेने कडुन त्वरीत चार्जिंग स्टेशन चालु करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** खारघर शहरातील नवी मुंबई महानगर पलिकेच्या परिवहन सेवेच्या इलेक्ट्रिक बस सेवा गेल्या काही दिवसांपासून वारंवार ठप्प होत असल्याने नागरिकांना गंभीर गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. बस वेळेवर चार्जिंग न झाल्यामुळे निर्धारित वेळापत्रकानुसार फेऱ्या चालवल्या जात नसल्याने प्रवाशांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

या विस्कळीत व्यवस्थेमुळे शाळा–कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे आणि नोकरीसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांचे हाल होत आहेत. सकाळच्या गर्दीच्या वेळेत बस उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थी उशिरा शाळेत पोहोचण्याच्या घटना वाढल्या आहेत



तर नोकरीसाठी प्रवास करणाऱ्यांना पर्यायी प्रवास साधनांचा वापर करावा लागत आहे. याशिवाय, वेळेअभावी वयोवृद्ध नागरिकांना बस थांब्यावर दीर्घकाळ ताटकळत बसावे लागत आहे, ही बाब नागरिकांच्या भावनांना चटका लावणारी ठरत आहे.

खारघर हे वेगाने विस्तारत असलेले आणि नियोजनबद्ध शहर असून येथे सार्वजनिक वाहतूक ही नागरिकांची मूलभूत गरज आहे. इलेक्ट्रिक बस सेवा आधुनिक, पर्यावरणपूरक आणि वेगवान वाहतूक सुविधा म्हणून अपेक्षित असताना पुरेशा क्षमतेच्या चार्जिंग सुविधांचा अभाव ही गंभीर समस्या ठरत आहे. अनेक बस पहिल्या फेरीनंतर चार्जिंगमुळे डेपोमध्येच थांबतात आणि सेवा ठप्प होते, अशी माहिती नागरिकांनी दिली आहे.

या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपशहर प्रमुख श्री. नंदु वारुंगसे यांनी परिवहन व्यवस्थापक, नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम (NMMT) यांना लेखी निवेदन सादर केले आहे.या निवेदनात वारुंगसे यांनी खारघर शहरात आधुनिक आणि स्वतंत्र NMMT बस चार्जिंग स्टेशन तात्काळ उभारण्याची मागणी केली आहे.वारुंगसे म्हणाले, "खारघरमधील नागरिकांना बससेवेचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. बस चार्जिंग सुविधांचा अभाव हे प्रशासनाच्या दुर्लक्षाचे उदाहरण आहे. चार्जिंग स्टेशन उभारणीसाठी तात्काळ निर्णय घेतल्यास बस सेवा नियमित होईल आणि नागरिकांना दिलासा मिळेल." सध्या NMMT प्रशासनाकडे ही मागणी औपचारिकरित्या पोहोचली असून बस चार्जिंग स्टेशन उभारणीसंदर्भात तातडीने निर्णय घेण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. खारघरमध्ये वाढत्या प्रवासी संख्येचा विचार करता बस सेवा सुरळीत ठेवणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत नागरिक, सामाजिक संघटना आणि विद्यार्थी व्यक्त करत आहेत.

# मानवी हक्कांची जाणीव आणि अंमलबजावणी गरजेची भारतीय संविधान मानवी जीवन मूल्य शिकवतात – प्रा.श्रीरामवार

**दैनिक युवक आधार**

**उमरी / प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय मानव अधिकार दिन व भारतीय संविधान अमृत महोत्सव दिना निमित्त मानो विकास सामाजिक सेवा प्रतिष्ठान द्वारा उमरी तालुक्यातील विविध शाळा महाविद्यालय येथे विद्यार्थ्या मध्ये जनजागृती करत मानवी हक्क व भारतीय संविधान प्रती मार्गदर्शन करण्यात येत आहे. प्रथम दिवसीय नूतन विद्यालय हायस्कूल उमरी, द वर्ल्ड स्कुल इंडिया उमरी, आदिशक्ती किड्स प्री प्रायमरी इंग्लिश स्कुल उमरी, येथे कार्यक्रम घेण्यात आले.




सर्वप्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच या प्रसंगी उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.

मानवी हक्कांची जाणीव आणि अंमलबजावणी गरजेची आहे तसेच भारतीय संविधान मानवी मूल्य शिकवतात. भारतीय संविधान राजकीय दस्ताऐवज नाही तर मानवी मूल्यांना प्रोत्साहन देणारे आहे. समाजात समानता, न्याय, बंधूत्वाला प्रोत्साहन देणारे दस्तऐवज आहे, असे प्रतिपादन मानो विकास सामाजिक सेवा प्रतिष्ठान चे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. दादासाहेब ऊर्फ रूपेशकुमार श्रीरामवार यांनी मानवी हक्क व भारतीय संविधानाचे महत्त्व पटवून दिले.

संविधानातील मानवी मूल्यांची जोपासना आपण केली पाहिजे, असे ते म्हणाले. या वेळी उपस्थित मानो विकास सामाजिक सेवा प्रतिष्ठान चे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. दादासाहेब ऊर्फ रूपेशकुमार श्रीरामवार , भीम आर्मी एकता मिशन नांदेड जिल्हा अध्यक्ष स्वप्निल भोसीकर ,सुखदेव भंडारे , बादल सिंग खिच्ची, मुख्याध्यापक शुभांगी माळवदकर मॅडम, नागेश लाखमोड सर व सर्व शिक्षक वृंद विध्यार्थी आदी अनेक जण यावेळी उपस्थित होते.

# शेडुंग टोल नाक्याच्या २० किमी परिघातील नागरिकांना टोल माफी द्या – निलेश सोनावणे आरपीआय पनवेल शहर अध्यक्ष

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी :** पनवेल ते खोपोली खालापूर या परिसरात नागरिकांना जावे यावे लागल्यास जुना पनवेल-पुणे महामार्गावर शेडुंग टोल नाका लागतो या टोल नाक्यावर जात येत असताना स्थानिकांना टोल भरावा लागत असल्याने नागरिकांना भुर्दंड बसतो त्यामुळे शेडुंग टोल नाक्याच्या २० किमी परिघातील नागरिकांना टोल माफी द्यावी अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याना लेखी निवेदनाद्वारे केली आहे. पनवेल तालुक्यातील तालुक्यात फिरताना देखील शेडुंग टोल



नाका येथे टोल भरावा लागणे म्हणजे आपल्याच घरात फिरताना कर देणे असे झाले आहे . पनवेल तालुक्यातील पोयंजे ,नढाल, बारवई ,टाकादेवी , चौक , भिंगारवाडी आदी गावात अनेकांचे नातेगोते आहेत त्यांच्या सुखदुःखात नेहमीच यावे -जावे लागते तसेच काही कामानिमित्त या परिसरात यावे जावे लागते त्यामुळे या परिसरात जाता येताना शेडुंग येथे टोल भरावा लागतो . शासनाने २० किमी परिघातील नागरिकांना टोल माफी चे निर्देश दिले असताना शेडुंग टोल नाका येथे स्थानिकांकडून सक्तीने टोल वसूल केला जातो सदर बाब आपण लक्षात घेता शेडुंग टोल नाक्याच्या २० किमी परिघातील नागरिकांना टोल माफी द्यावी असे लेखी आदेश टोल चालक कंपनीला द्यावे अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी . मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. ,रायगड जिल्हाधिकारी ,पनवेल प्रांत अधिकारी यांच्याकडे निलेश सोनावणे यांनी केली आहे

# साई परिवार सेवाभावी ट्रस्ट अध्यक्ष मंगेश अंकुश रासम सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**मुंबई वार्ताहर :** सेनादल अधिकारी तथा सीबीआय क्राईम ब्रँच कमांडो ज्येष्ठ अधिकाऱ्यांसाठी आयोजित राष्ट्रीय युवा अधिवेशन नुकतेच तेलंगणा राज्याच्या भाग्यनगर शहरात पार पडले.या तीन दिवसिय अधिवेशनात राष्ट्रभरातील २५ व्यक्ती तथा संस्थांचा विशेष उपस्थिती सन्मान सोहळा संपन्न झाला. साई परिवार सेवाभावी ट्रस्ट अध्यक्ष श्री. मंगेश अंकुश रासम हे गेली ४० वर्ष समाज सेवेत आणि अन्नदान सेवेमध्ये यशस्वीरित्या परिपूर्ण कार्य करीत आहेत. त्यांच्या या कार्याचा यथोचित गौरव म्हणून ज्येष्ठ आण्विक शास्त्रज्ञ तथा अनेक राष्ट्रांचे आण्विक सल्लागार म्हणून कार्यरत श्री घंटी सूर्यनारायण मूर्ती यांच्या द्वारा सदर



सन्मान वेद फाउंडेशन अध्यक्ष स्वप्नील वाडेकर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.आदिवासी भागातील विवाह सोहळा आयोजन समितीमध्ये कार्यरत असल्यामुळे श्री.मंगेश रासम आदिवासी भागात दिवस रात्र कार्यरत होते त्यांच्या या कार्यामुळे युथ फॉर् नेशन संस्थेच्या विशेष अधिवेशनात उपस्थित असलेले स्वप्नील राणी नंदकुमार यांनी तो श्री. मंगेश यांच्यासाठी स्वीकारला. भारताचे आण्विक शास्त्रज्ञ यांनी श्री मंगेश रासम यांना आम्ही गत अडीच ते तीन वर्षे ओळखत असून त्यांचा कार्य जवळ पाहत आहोत आणि त्यामुळे त्यांना हा सन्मान विविध लष्करी अधिकारी सैन्य अधिकारी यांच्यासमोर प्रदान करण्यात येत आहे तथा त्यांची अनुपस्थिती आम्हाला त्रासदायक असली तरी त्यांचं कार्य सतत पुढे चालूच राहावं ही या सन्मानाची शुभकामना आहे असे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले भाग्यनगर मध्ये आयोजित सदर सोहळ्यामध्ये दिल्लीमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या सर्व शहिदांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली आणि लवकरच सरकार द्वारा होणाऱ्या आतंकवाद विरोधी कारवाईला लष्कराचा पाठिंबा देखील दर्शविण्यात आला.

# जासई विद्यालयातील गुरुकुल मुलांना दिले आपत्ती व्यवस्थापन प्रात्यक्षिकाचे धडे

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर :** रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कुल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागांव,विभाग जासई ,ता. उरण जि.रायगड या विद्यालयात मंगळवार दि.९डिसेंबर २०२५ रोजी विद्यालयातील विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनावर मार्गदर्शन व प्रात्यक्षिकाचा उपयुक्त कार्यक्रम संपन्न झाला. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अध्यक्ष सौ. म्हात्रे के. जी. व मार्गदर्शक श्री. म्हात्रे एम. के. यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना










भूकंप, पूर, भूस्खलन, आग, गॅस स्फोट यांसारख्या आपत्तींमध्ये घ्यावयाची काळजी तसेच प्रथमोपचाराची माहिती देण्यात आली.

अग्निशमन यंत्राचा वापर, आगीतील बचाव, हार्ट अटॅक व चक्कर आल्यास करावयाची तात्काळ मदत यांविषयी प्रभावी प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम यशस्वी ठरला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाविषयी जागरूकता आणि सुरक्षिततेची जाण वाढीस लागते. याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या सौ.म्हात्रे के.जी.मॅडम यांनी आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शक व प्रशिक्षक श्री.म्हात्रे एम.के.यांचे स्वागत व सत्कार केला.तसेच पर्यवेक्षिका सौ.मुकादम के.एस. मॅडम ,तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्रीम.घरत एम.के.मॅडम यांनी केले.

# दिबांच्या विमानतळ नामकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकारात्मक; मुख्यमंत्री लवकरच प्रेस स्टेटमेंट देणार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या विमान उड्डाणापूर्वी दिबासाहेबांचे नाव दिले जावे, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची राज्याचे वने मंत्री गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने आज नागपूर येथे चर्चा भेट घेतली. लोकनेते दि. बा. पाटील विमानतळ नामकरणाच्या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपण सकारात्मक असल्याचे आणि या संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्याला आश्वस्थ केले आहे असे सांगितले असून मुख्यमंत्री महोदय लवकरच प्रेस स्टेटमेंट देणार असल्याची माहिती आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रसार माध्यमांना दिली. यावेळी त्यांच्यासमवेत लोकनेते दि. बा. पाटील यांचे चिरंजीव अतुल पाटील, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, आमदार किसन कथोरे, आमदार महेश बालदी, तसेच समितीचे सदस्य उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी शिष्टमंडळाच्यावतीने बोलताना सांगितले कि, लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येत्या २५ तारखेला खुला होणार आहे. तो खुला



होण्याच्या आधी राज्य सरकारने या विमानतळाला घोषित केलेले लोकनेते दि. बा. पाटील हे नामकरण किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भाषेतील दिबांच्या नावाचा नामविस्तार व्हावे या दृष्टिकोनातून आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्री गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने भेट घेतली. आणि विमानतळावर पहिले उड्डाण होण्याआधी या विमानतळाचे दिबासाहेबांच्या नावाने नामकरण झाले पाहिजे यासाठी प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांमध्ये मागणी व अस्वस्था आहे आणि ठिकठिकाणी वेगवेगळया पद्धतीच्या आंदोलनांची घोषणा होत आहे. अशावेळेला या विमानतळाला दिबासाहेबांचे नाव पहिले उड्डाण होण्यापूर्वी लागले पाहिजे हि प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांची तळमळ आहे. लोकनेते दि. बा. पाटील यांचे विमानतळाला लावण्यासाठी झालेल्या अनेक मोर्चे, आंदोलन संघर्षात आम्हा सर्वांवर फौजदारी गुन्हे दाखल असल्याचे सांगून सगळयात जास्त तळमळ आमच्यामध्ये प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांमध्ये असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रसार माध्यमात नमूद केले. त्यामुळे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आम्ही सर्वांनी भेट घेत उड्डाणापूर्वी दिबासाहेबांच्या नावाने विमानतळाचे नामकरण झाले पाहिजे अशी पुनर्मागणी केली. नेमके त्याच्या आधी होईल का सांगता येणार नाही. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आश्वस्थ केले आहे त्यामुळे विमानतळाला दि. बा पाटील साहेबांचे नाव लागणारच असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. या यासंदर्भात त्यांनी प्रेस स्टेटमेंट द्यावे अशी आमच्या शिष्टमंडळाने विनंती केली, त्यावर त्यांनी या संदर्भामध्ये लवकरच यथायोग्य प्रेस स्टेटमेंट देणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे लवकरच मुख्यमंत्री महोदय आपली प्रेस स्टेटमेंट देऊन प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांमधील संदिग्धता मिटवतील अशी अपेक्षा आहे. आणि प्रत्यक्ष ज्या वेळेला दिबासाहेबांच्या नावाचे नामकरण होईल त्या वेळेला विजयी उत्सव आम्ही साजरा करू असेही यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोलताना सांगितले. विरोधकांच्या वक्तव्यावर विचारलेल्या पत्रकारांच्या प्रश्नावर बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले कि, खरं तर ज्या प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांनी आंदोलनात भाग घेतला त्यांना या संदर्भात जाब विचारण्याचा अधिकार आहे. पण ज्यांनी दि. बा. पाटील साहेबांचे नावही घेतले नाही कारण त्यांना त्यावेळी दिबासाहेबांच्या नावाची काविळ होती आणि राजकारणात तर फार आधीपासून असताना यापूर्वी झालेल्या आंदोलनात ते कुठेही दिसले नाहीत, उलट हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव दिले जावे याच्यापुढे ते शब्दही काढत नव्हते अशांना तर आम्हाला कुठलाही प्रश्न विचारायचा अधिकार नाही, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी रोखठोकपणे स्पष्ट केले. ज्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आम्हाला पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा शब्द आहे सांगतात आणि तसे आश्वस्थ करतात तो आमच्यासाठी अंतिम आहे. पंतप्रधानांना या संदर्भात भेटणार का असा पत्रकारांच्या प्रश्नावर उत्तर देताना आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून प्रयत्न करत आहोत त्यांच्या नेतृत्वाखाली जे काही प्रयत्न करायचे आहेत ते सर्व प्रयत्न करू, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी शिष्टमंडळाच्या वतीने स्पष्ट केले.

# माजी सैनिकांसाठी रोजगाराची सुवर्ण संधी ७२ पदांसाठी ऑनलाईन अर्जाची अंतिम तारीख ३१ डिसेंबर

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील :** दि.१० डिसेंबर (जिमाका) सैनिक कल्याण विभागांतर्गत तसेच विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात लिपिक टंकलेखक (गट-क) या श्रेणीतील एकूण ७२ पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.ही भरती फक्त माजी सैनिकांसाठी तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. RTA 1082/3502/CR 100/16-A, दिनांक 02 सप्टेंबर 1983 मधील परिच्छेद 2 नुसार पात्र असलेल्या उमेदवारांसाठीच मर्यादित आहे.

त्यानुसार —युद्धकाळात

**31 डिसेंबर 2025 रोजी रात्री 23.59 वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज स्वीकारले जातील.निर्धारित वेळेनंतर अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध राहणार नाही.**

किंवा युद्ध नसताना सैनिकी सेवेत शहीद झालेल्या किंवा अपंगत्वामुळे सेवास अयोग्य ठरलेल्यांच्या कुटुंबातील एक आश्रितास, प्राधान्यक्रमानुसार अर्ज करण्याची पात्रता राहील. अर्ज प्रक्रिया (Web-Based Online Application) इच्छुक व पात्र उमेदवारांनी आपला अर्ज www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील Resources Tab Recruitment Tab येथे ऑनलाईन पद्धतीने सादर करावयाचा आहे.

# डॉ.नंदकुमार मारुती जाधव फाऊंडेशन संचालित बौध्दिक अक्षम मुलांची विशेष शाळा तर्फे आहार व पोषण विषयक कार्यशाळा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** ३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिनानिमित्त शाळेत आठवडाभर पालक व विदयार्थी यांचेसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी विद्यार्थ्यांच्या आरोग्यविकासात पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मुलांच्या आहारातील त्रुटींमुळे वाढ, एकाग्रता, अभ्यासाची क्षमता तसेच मानसिक आरोग्यावरही परिणाम होतो. म्हणूनच पालकांना पोषणाविषयी योग्य माहिती मिळावी आणि घरातील आहार सवयी सुधाराव्यात या उद्देशाने आमच्या शाळेत दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी "आहार व पोषण" या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत शाळेतील 52 पालक उपस्थित होते. आहार व पोषण या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी मा.श्री.परसराम बाजंत्री, आहारतज्ञ उपस्थित होते. शाळेच्या विद्यार्थ्यांच्या हस्ते उपस्थित पाहुण्यांचे स्वागत झाले .

सौ मंजिरी बागकर विशेष शिक्षिका यांनी जागतिक दिव्यांग सप्ताहामध्ये शाळेत दरवर्षी व यावर्षी साजरा होणाऱ्या कार्यक्रमांची थोडक्यात माहिती उपस्थित त्यांना दिली . त्यानंतर

सौ.अस्मिता माटेकर विशेष शिक्षिका यांनी आहारतज्ञ यांचा सर्वांना परिचय करुन देऊन कार्यशाळा सुरु करणेबाबत विनंती केली.

**कार्यशाळेचे प्रमुख उद्देश:-**

1. पालकांना संतुलित व पौष्टिक आहाराचे महत्त्व पटवून देणे.
2. मुलांसाठी दैनंदिन योग्य आहार नियोजन कसे करावे हे शिकवणे.
3. फास्ट-फूड, पॅकेज्ड फूडचे दुष्परिणाम स्पष्ट करणे.
4. कुपोषण, रक्ताल्पता (ॲनिमिया) व वाढीतील अडथळे ओळखण्याची माहिती देणे.
5. घरगुती उपलब्ध पदार्थांमधून पोषण कसे वाढवता येते हे सांगणे.




6. बद्धकोष्ठता बाबत मार्गदर्शन
7. जीवनसत्वे ,प्रथिने ,कर्बोदके, पोषणमूल्य पाणी , योग्य प्रमाणात आहारातून कसे खाण्यास द्यावे

आहारतज्ञांनी खालील विषयावर पालकांना मार्गदर्शन केले.

1. संतुलित आहार तीन मुख्य गट यामध्ये ऊर्जा देणारे पदार्थ शरीर बांधणी करणारे पदार्थ शरीराला संरक्षण देणारे पदार्थ याची माहिती दिली
2. लहान मुलांच्या पोषण गरजा
3. जंक फूडचे दुष्परिणाम – स्थूलता, थकवा, एकाग्रतेचा अभाव
4. ॲनिमियाविषयी माहिती – लक्षणे, प्रतिबंध, आयरनयुक्त पदार्थ

. 5 . पोषण युक्त नाश्ता

6. घरातील साखर व मीठाचे प्रमाण कमी करण्याच्या पद्धती
7. आरोग्यदायी संतुलित आहार (जेवणाचे ताट) कसे असावे याचे मार्गदर्शन केले .
8. ओमेगा 3 हा महत्वपूर्ण फॅट व त्याचे महत्त्व सांगितले .

आरोग्यदायी आठवड्याचे आहार नियोजन" कसे केले पाहिजे तसेच .कुठल्याही पॅक फूडवरील 'पोषण मूल्य लेबल' वाचण्याचे मार्गदर्शन पालकांना केले.

अंतिम कार्यक्रम हा प्रश्नोत्तर: चा होता यामध्ये पालकांनी मुलांच्या खाण्याच्या सवयी, चॉकलेट/कोल्डड्रिंकचे प्रमाण, वाढीचा वेग, व्हिटॅमिन सप्लिमेंट्स याबाबत प्रश्न विचारले.व यावर आहार तज्ञांनी पालकांच्या प्रश्नांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला

ही कार्यशाळा पालकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली. घरातील आहार पद्धतीत बदल करण्याबाबत पालकांची जागरूकता वाढली. विद्यार्थ्यांचे सर्वांगीण आरोग्य सुधारण्यासाठी शाळा व पालक एकत्रितपणे काम करतील असा विश्वास निर्माण झाला. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ .जाधव मॅडम यांनी उपस्थितांशी संवाद साधून आहार तज्ञांचे उपयुक्त अशा विषयावर केलेल्या मार्गदर्शनाबद्दल आभार पत्र देऊन तज्ञांचे, पालकांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# "लाडक्या बहिणींना अडवणारे तुम्हीच! योजना बंद करण्यासाठी कोर्टात कोण गेले होते ?"

### लाडकी बहिण योजनेवरून सुरू असलेल्या टीकेला हिवाळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिले सडेतोड प्रत्युत्तर

**दैनिक युवक आधार**

**नागपूर / प्रतिनिधी :** हिवाळी अधिवेशनात माझी लाडकी बहीण योजनेवरून आज जोरदार गदारोळ पाहायला मिळाला. महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी स्पष्ट, मुद्देसूद उत्तरे दिल्यानंतरही विरोधक गदारोळ घालत होते. या गोंधळानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थेट विरोधकांवर हल्लाबोल करत सडेतोड प्रत्युत्तर दिले. शिंदे म्हणाले की, योजना सुरू करतानाच तिला "फसवी घोषणा'' ठरवण्याचे काम विरोधकांनी केले. इतकेच नव्हे तर योजना बंद व्हावी म्हणून तुमच्याच नेत्यांनी कोर्टाची पायरी चढली. " वडपल्लीवार कोर्टात गेले नव्हते का? मग आज कोणत्या तोंडाने लाडक्या बहिणींचा मुद्दा काढता?" असा तिरकस सवाल शिंदेंनी केला.ही योजना थांबवण्यासाठी केलेल्या विरोधकांच्या प्रयत्नांना हायकोर्टानेही फटकारले होते. महिलांचा लाभ न थांबू देण्याचा निर्धार सरकारने केला, असे शिंदे म्हणाले. आचारसंहितेच्या काळातही लाभार्थींना अडथळा येऊ नये म्हणून ॲडव्हान्स निधी दिल्याचा उल्लेख त्यांनी केला. "लोकांचे पैसे लोकांनाच देण्याची दानत आम्ही दाखवली, तुमच्या सरकारने कधी नाही," असा टोला त्यांनी लगावला.

लाडकी बहीण योजना कोणत्याही परिस्थितीत बंद होणार नाही. दिलेली सर्व वचने योग्य वेळी पूर्ण केली जातील, हा ठाम संदेश शिंदेंनी विरोधकांना दिला. "लाडक्या बहिणींनीच तुमचा टांगा पलटी केला आहे. त्यामुळे योजनेच्या विरोधात यापुढे एकही शब्द काढू नका," असा इशाराही शिंदेंनी विरोधकांना दिला.

# ज्येष्ठ फोटोग्राफर अरविंद खरात यांचा विधानपरिषदेचे सभापती राम शिंदेंनी केला गौरव

### सलग ३० वर्षे नागपूर हिवाळी अधिवेशन कामकाज कव्हर केले

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** गेली ३० वर्षे नागपूर हिवाळी अधिवेशन कामकाज कव्हर करणारे मुंबईतील ज्येष्ठ फोटोग्राफर अरविंद खरात यांचा विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी आज त्यांच्या दालनात गौरव केला.

सन १९९५ मध्ये शिवसेनेचे पहिले मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या कारकीर्दीत अरविंद खरात यांनी नागपूर हिवाळी अधिवेशन कामकाज कव्हर करायला सुरुवात केली आणि आज



२०२५ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कारकीर्दीत त्यांना हे कामकाज कव्हर करताना ३० वर्षे पूर्ण होत आहेत.

विधानसभेची वर्षभरात तीन अधिवेशन होत असतात. त्यातील पावसाळी आणि अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबईमध्ये पार पडते तर उपराजधानी नागपूर येथे हिवाळी अधिवेशन पार पडते.

वयाची ६१ वर्ष पूर्ण होत आली तरी अरविंद खरात हे अधिवेशन काळात फोटोग्राफर म्हणून कामकाज कव्हर करताना दिसत असतात त्याबद्दल त्यांचे कौतुकही केले जाते.

आज त्यांचा गौरव करण्यात आला त्याबद्दल पॉलिटिकल फोटो जर्नालिस्ट असोसिएशन या संघटनेने अभिनंदन केले आहे.

# भीम शाहीर सदानंद मोरे यांचा संगम काव्यधारा पुस्तक देऊन चैत्यभूमी मुंबई येथे सत्कार

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/मुंबई :** प्रबोधनकार भीमशाहीर सदानंद मोरे यांनी प्रबोधनातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रबोधनातून डॉ. बाबासाहेब यांना चैत्यभूमी दादर मुंबई 6 डिसेंबर महानपरिनिर्वाण दिनानिमित्त मानवंदना जाहीर सत्कार करण्यात आला.भारतीय संविधानाचे शिल्पकार ,बोधिसत्व ,परमपूज्य महामानव, युगपुरुष दिनदुबळयांचे उद्धार करते, ज्ञान पंडित, प्रज्ञा सूर्य ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना 69 व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त 6 डिसेंबर 2025 रोजी पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यातील प्रबोधनकार भीमशाहीर सदानंद मोरे यांनी आपल्या गायनाच्या माध्यमातून कधी होतील भीमा तुझ्या भेटीसाठी, भीमा घे पुन्हा जन्म तू या दिनांसाठी, तो लाल भिमाईचा भारी लाखो हजारात, चंदनासमान झिजला तो साक्षी आहे ,संविधान क्रांतिकारी गीत सादर केले . यावेळी महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध



गायक विष्णु शिंदे, संगम काव्यधारा कवी गायक संगम कासारी यांनी प्रकाशित केलेली पुस्तक भेट देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे, महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी गायक संगम कासारे, गायक उत्कर्ष शिंदे ,गायक गौतम हराळ, गायक रवींद्र गमरे ,गायक अजय शिंदे ,भीम शाहीर प्रदीप कडबे, गायक भगवान कानडे ,गायक हार्दिक कासारे, गायक देवानंद जगताप ,गायक धोंडीबा रोडे, गायक अनिल लेहनार, गायक अशोक महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी गायक संजय जामनेर , पोलीस मुंबई सुनील धांडे ,कार्यक्रमाचे मुख्य संयोजक आमदार प्रकाश गजभिये इत्यादी मोठ्या संख्येने समाज बांधव गायक कलावंत उपस्थितीत होते.

# ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढावा यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीचा सच्चा साथी हरपला

### कष्टकऱ्यांचा बुलंद आवाज बाबा आढाव यांच्या निधनाने सामाजिक समतेचा दीपस्तंभ हरपला : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (आनंद पवार) :** हमाल पंचायत स्थापन करून कष्टकऱ्यांचा आवाज बुलंद करणारे ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांच्या निधनाने शोषित,पिडीत श्रमिक,गरीब, बहुजनांचा आधारवड, एक गाव एक पाणवठा चळवळ उभारणारे सामाजिक समतेचा दीपस्तंभ हरपला आहे अशा दुःखद शब्दांत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी दिवंगत बाबा आढाव यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे.

दिवंगत ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांच्याशी अत्यंत घनिष्ठ व



आपुलकीचे ऋणानुबंध असल्याची प्रतिक्रिया ना.आठवले यांनी यावेळी व्यक्त केली.ज्येष्ठ समाजसेवक कृतिशील विचारवंत कामगार कष्टकऱ्यांचे लढाऊ नेते म्हणून बाबा आढाव यांचे योगदान अतुलनीय आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनात त्यांनी सहभाग घेतला होता.नामांतर आंदोलनाला पाठिंबा देणारे ते कृतिशील विचारवंत होते.समाजवादी विचारसरणी सोबत त्यांनी नेहमीच आंबेडकरी चळवळीला साथ दिली आहे.ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीचा सच्चा साथी हरपल्याची दुःखद प्रतिक्रिया ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केली.

नामांतर आंदोलन, कामगारांचा न्याय हक्कासाठीचे आंदोलन अनेक आंदोलनात बाबा आढाव अग्रेसर असायचे.ज्या ज्या वेळी पुण्यात जायचो तेव्हा बाबा आढाव यांची नेहमी भेट व्हायची अलीकडे त्यांच्या प्रकृतीचा चौकशीसाठी मी त्यांच्या निवासस्थानी सुद्धा दोन वेळा भेट घेतली होती. त्या भेटीत बाबा आढाव यांनी मला पुण्यातील रेल्वे स्टेशन येथील मालधक्का हलवला जात आहे.तिथे मालगाड्यांचा थांबा,येथील हमालांच्या रोजीरोटीचा प्रश्न सोडविण्यासाठी माझ्याशी चर्चा केली.आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत बाबा आढाव यांनी गोरगरिब कष्टकरी कामगारांचे प्रश्न सोडविण्याबाबत ते समर्पित होते.बाबा आढाव यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीची कधीही न भरून येणारी अशी हानी झाली आहे. अशी शोकभावना ना.रामदास आठवले यांनी पाठवलेल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे.

# पिंटू पाटील वायफनिकर यांच्या पुढाकारातून माहूर-सिंदखेड बससेवा सुरू

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर/(प्रतिनिधी) सय्यद ईसा :** नांदेड जिल्ह्यातील माहूर आगारामार्फत आमदार हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व पिंटू पाटील यांच्या अथक प्रयत्नातून स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच माहूर ते सिंदखेड बस सेवा सुरू करण्यात आली असून माहूर सिंदखेड या मार्गावरील शालेय विद्यार्थ्यांसह दैनंदिन कामानिमित्त तालुक्याच्या ठिकाणी ये-जा करणाऱ्यांना नागरीकांना सोयीचा प्रवास मिळणार असल्याने युवानेते पिंटू उर्फ लक्ष्मीकांत पाटील वायफनिकर यांचे शालेय विद्यार्थ्यांसह सर्व स्तरातून आभार व्यक्त करण्यात येत आहे.

सिंदखेड ते माहूर या मार्गावर अनेक लहान मोठ्या गावांचा समावेश आहे.

परिसरातील नागरिकांना



शासकीय,दैनंदिन कामासाठी,तसेच माहूर या तालुक्याच्या ठिकाणी दररोज ये - जा करावी लागते.

मात्र बससेवेअभावी शालेय विद्यार्थ्यांना,ज्येष्ठ नागरिकांसह सामान्य जनतेला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

परणामी परिसरात काही शालेय विद्यार्थ्यांना पायदळी जाऊन शिक्षण घ्यावे लागत होते.

विद्यार्थी व नागरिकांच्या गरजेला ओळखून पिंटू पाटील यांनी विद्यार्थ्यांची व दैनंदिन प्रवाशांची बस सेवेअभावी होणारी गैरसोय पाहता विद्यार्थ्यांसह आंदोलन उभारून आमदार हेमंत पाटील यांच्या निदर्शनास सदर बाब आणून दिली होती.

कर्तव्यदक्ष आमदार हेमंतभाऊ पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिलेल्या निर्देशानंतर तत्काळ माहूर ते सिंदखेड बससेवा सुरू झाली असून माहूर ते सिंदखेड प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांसह नागरीकांना प्रवास सोयीचा होणार आहे. दरम्यान पिंटू पाटील वायफनिकर यांनी राज्य परिवहन महामंडळ अधिकाऱ्यांसह आमदार हेमंत पाटील साहेब,शिवसेना जिल्हाप्रमुख विवेक देशमुख,शिवसेना तालुका प्रमुख माहूर सुदर्शनभाऊ नाईक यांच्यासह सर्व सहकारी कार्यकर्त्यांचे आभार मानले.

# निफाड तालुक्यातील विष्णूनगर येथील गट्टू कंपनीत भीषण आग; लाखोंचा साठा बचावला

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी :** विंचूरजवळील विष्णूनगर गट क्रमांक 67 मधील गट्टू उत्पादन कंपनीत आज पहाटेच्या सुमारास लागलेल्या आगीत हजारो रुपयांच्या मक्याच्या बिट्या जळून खाक झाल्या. डॉक्टर सचिन जेऊघाले यांच्या मालकीची ही कंपनी चांदवड येथील वर्धमान छाजेड यांनी भाडे तत्वावर चालवत आहे

कंपनी परिसरात बॉयलरसाठी मोठ्या प्रमाणावर मक्याच्या बिट्यांचा साठा ठेवण्यात आला होता. पहाटे अचानक या बिट्यांच्या विशाल



ढिगाऱ्यातून धुराचे लोळ उठू लागल्यानंतर कामगारांच्या निदर्शनास ही घटना आली. घटनेची माहिती मिळताच लासलगाव येथील सिद्धवीर हनुमान मित्र मंडळाच्या टँकरने सर्वप्रथम घटनास्थळी धाव घेत प्राथमिक स्तरावर आग विझवण्याचे काम सुरू केले.

यानंतर निफाड, चांदवड आणि मनमाड येथील अग्निशामक दलाच्या तीन बंबांनी घटनास्थळी दाखल होऊन संयुक्तरीत्या आग विझवण्याची मोहिम राबवली. जवळपास काही तास चाललेल्या शर्थीच्या प्रयत्नांनंतर आग पूर्णतः नियंत्रणात आणण्यात यश आले.

आगीमध्ये काही लाखो रुपयांच्या मक्याच्या बिट्या जळून खाक झाल्या असल्या तरी, आग लवकर लक्षात आल्यामुळे आणि अग्निशामक दलाच्या तत्परतेमुळे लाखो रुपयांचा मोठा साठा सुरक्षित राहिल्याची माहिती कंपनी व्यवस्थापनाने दिली.

दरम्यान, लासलगाव पोलिस ठाण्याचे हवालदार जाधव यांनी घटनास्थळी भेट दिली असून आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

## माहूर पुसदच्या रेस्क्यू टीमने टाकळी येथून वानरास केले जेरबंद

**दैनिक युवक आधार**

**(प्रतिनिधी )/सय्यद इसा :श्रीक्षेत्र माहूर :** माहूर तालुक्यातील मौजे टाकळी येथे एका वानराने अनेक दिवसापासून येथील नागरिकांना हल्ले करून नुकसान करणे सह इतर प्रकारे उपद्रव माजवून सळो की पळो करून सोडले होते त्यामुळे येथील सरपंच आणि ग्रामसेवकांनी निवेदन देऊन सदरील वानराचा बंदोबस्त करण्याची मागणी केली होती त्यामुळे वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांनी 24 तासाच्या आत उपवन संरक्षक केशव वाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुसद आणि माहूर च्या कर्मचाऱ्यांची रेस्क्यू टीम बनवून स्वतः हजर राहून उपद्रवी वानरास दि 10 रोजी जेर बंद केले.उपवनसंरक्षक नांदेड केशव वाबळे सहाय्यक वनसंरक्षक किनवट किरण चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच रोहित जाधव वनपरिक्षेत्र अधिकारी माहूर यांच्या आदेशान्वये वनपरिक्षेत्र कार्यालय माहूर अंतर्गत वनपरिमंडळ माहूर नियतक्षेत्र वझरा मधील मौजे टाकळी या गावात मागील काही दिवसांपासून एका नर वानर गावातील लोकांवर हल्ला करून पळून जात असे.या वानराला



पुसद येथील आर आर यु टीम च्या मदतीने पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या निगराणीत रेस्क्यू करण्यात आले व त्याला निसर्गाच्या सानिध्यात सोडण्यात आले.

यावेळी वनपाल माहूर मनोहर कत्तुलवार वनरक्षक दिपक माने महेश मांजलवाड आर आर यु टीम चे प्रमुख शे. मुखबीर वनरक्षक रवी राठोड, किरण सातपुते मानद वन्यजीव रक्षक पशुसेवक रवी मोरे वनसेवक कैलास जाधव व परमेश्वर नाईक यांचे सह गावकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

निवेदनाची दखल घेऊन तात्काळ कारवाही करून वानरास जेरबंद केल्याप्रकरणी माहूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांचे अभिनंदन होत आहे.

## पोलीस जाणीव सेवा संघ महाराष्ट्र राज्य – मुंबई मुख्य संपर्क कार्यालयाचे अंधेरीत भव्य उद्‌घाटन

**दैनिक युवक आधार**

**किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख :** पोलीस बांधवांच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या पोलीस जाणीव सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्या मुंबई मुख्य संपर्क कार्यालयाचे भव्य उद्घाटन अंधेरी (पूर्व) येथे अत्यंत उत्साहात संपन्न झाले. संघाचे संस्थापक अध्यक्ष रविसर फडणीस यांच्या हस्ते रिबीन कापून कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

उद्घाटन सोहळ्यास पोलिस दलातील अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांची विशेष उपस्थिती लाभली. प्रमुख पाहुण्यांमध्ये अंधेरी विभागाचे सहायक पोलिस आयुक्त गजानन पवार, मेघवाडी विभागाचे सहायक पोलिस आयुक्त संपतराव पाटील, एमआयडीसी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र वाणी, तसेच अंधेरी पोलिस स्टेशनचे



पोलीस उपनिरीक्षक रोहन सुर्वे आणि सहायक निरीक्षक प्रमोद मगर उपस्थित होते.

यावेळी मराठी चित्रपटसृष्टीचे दिग्दर्शक व निर्माते विनय कोठारी, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे उपाध्यक्ष ज्येष्ठ विधिज्ञ उदय वारंजीकर, तसेच पोलिस तपासचे मुख्य संपादक राजु जाधव यांनीही उपस्थिती दर्शवून कार्यक्रमास विशेष गती दिली.

संघाच्या वतीने मुंबई प्रदेशातील विविध पदाधिकारी— महाराष्ट्र महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुख संजय शेकोकार, मुंबई अध्यक्ष तुषार रजपूत, मुंबई उपाध्यक्ष सदानंद रजपूत, क्राईम फोटोग्राफर दादा पराग रजपूत, प्रशांत शिंदे आदींनी या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमातील वैशिष्ट्यपूर्ण भाग म्हणजे पोलिस जाणीव सेवा संघाच्या माध्यमातून अनेक वेळा उत्कृष्ट बंदोबस्त बजावणाऱ्या पथकांचा सत्कार. ठाणे टीम आणि खार दांडा टीम यांना कार्यगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी ठाणे जिल्हा अध्यक्ष अमित जगताप, उपविभाग प्रमुख अंजली खाणकरी, तसेच खार दांडा शाखा अध्यक्ष हरिश्चंद्र गोसावी, उपाध्यक्ष रूपेश मयेकर, सल्लागार खिमजी मजेठिया, चिनुभाई दाभी यांची टीम उपस्थित होती.

उद्घाटन सोहळ्यास जालना जिल्हा अध्यक्ष किशोर नाटकर, परमेश्वर अपार, क्राईम रिपोर्टर हेमंत जैन, डॉ. राहुल राज गायकवाड, तसेच कानाजुरे, गणेश जाधव, भालचंद्र म्हात्रे, मुस्तफा सिद्दीकी, विश्वनाथ शिंदे, शांताराम पाटकर, सुनील मिश्रा, अवधूत नाईक, अक्षय गावडे, प्रशांत डाफळे, कार्तिकी अवसारे, लक्ष्मी बनसोडे, अनु साठे, ज्योती कदम, मल्लमा बोडा, निसार शेख, आणि प्रमोद मोहीते आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस बांधवांची जाणीव जागृती, सामाजिक बांधिलकी आणि जनतेला न्याय मिळवून देणे हे पोलिस जाणीव सेवा संघाचे मुख्य ध्येय असून, नव्या कार्यालयाच्या माध्यमातून हे कार्य अधिक प्रभावीपणे करण्यात येणार असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## ग्रामपंचायतीचा प्रशंसनीय पुढाकार

### जरंडीत आरओ प्लॅन्ट व पिठगिरणी सुरू; बचत गटाचा उपक्रम...

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे :** तालुक्यातील जरंडी येथील ग्रामपंचायतीच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढावे आणि महिलांना आर्थिक बळकटी मिळावी या उद्देशाने आरओ शुद्ध पाणी प्लॅन्ट व पिठगिरणी या दोन महत्त्वाच्या उपक्रमांचे मंगळवारी दि.९/१२/२५ उद्घाटन करण्यात आले.उद्घाटन सोहळा सरपंच सौ.स्वाती दिलीप पाटील यांच्या हस्ते पार पडला. सरपंच स्वातीताई पाटील म्हणाल्या की, "ग्रामस्थांना शुद्ध पाणी नाममात्र शुल्कात उपलब्ध करून देणे आणि पिठगिरणीतून कमी दरात दळण सेवा देणे हा ग्रामपंचायतीचा लोकाभिमुख उपक्रम आहे."वीस लिटर शुद्ध पाणी नाममात्र शुल्कात ग्रामस्थांना उपलब्ध केले जाणार असून,पिठगिरणीमधूनही



गावकऱ्यांना कमी किंमतीत दळण सेवा पुरवली जाणार आहे.या उपक्रमांचे संचालन गावातील जय भवानी महिला बचत गटाच्या अध्यक्षा सौ. ध्रुपताबाई सोनवणे यांच्याकडे सोपविण्यात आले आहे."महिला सक्षमीकरणासाठी बचत गटावर विश्वास ठेवून ही जबाबदारी देण्यात आली असून, यातून महिलांना आर्थिक व व्यावसायिक प्रगतीची संधी मिळेल,"असे ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे यांनी सांगितले.

उद्घाटन प्रसंगी उपसरपंच संजय संजय पाटील,विस्तार अधिकारी सुनील राकडे, दिलीप पाटील,अमृत राठोड, माजी पंचायत समिती सदस्य संजीवन सोनवणे,मधुकर पाटील,मधुकर सोनवणे, सिद्धार्थ मोरे,श्रीराम पाटील, भिवा चव्हाण,माधव मोहिते, सोयगावचे मा. उपनगराध्यक्ष योगेश पाटील,शिवसेना महिला आघाडीच्या ध्रुपताबाई सोनवणे,आदी मान्यवरांची उपस्थिती होती.या उपक्रमासाठी सतीष बाविस्कर,संतोष पाटील, भास्कर निकम आदींनी पुढाकार घेतला..

**ग्रामसेवकांची प्रतिक्रिया**

ग्रामसेवक सुनील मंगरुळे म्हणाले,"आर ओ प्लॅन्ट आणि पिठगिरणी उपक्रमामुळे ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल तसेच महिला बचत गटाच्या माध्यमातून गावातील महिलांना आर्थिक स्वावलंबनाची मोठी संधी मिळणार आहे. हा उपक्रम गावाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरेल."

## डेहणी गावात हळहळ, पत्नी पाठोपाठ पतीचाही मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**उमेश साखरकर/दिग्रस प्रतिनिधी :** सात जन्माची सोबत' ही म्हण केवळ बोलण्यापुरती नसते, तर काही जोडपी ती खऱ्या अर्थाने जगतात. दिग्रस तालुक्यातील डेहणी (कलगाव) येथे याचीच प्रचिती देणारी एक हृदयद्रावक घटना घडली. अर्धांगिनीचा मृत्यू होताच, तिचा विरह सहन न झाल्याने पतीनेही अवघ्या दोन दिवसांत प्राण सोडले. या घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून, एका सुखी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.डेहणी येथील रहिवासी शेख जानी शेख निजामोद्दीन (वय ७४) आणि त्यांची पत्नी मरियम बानो हे गावात गुण्यागोविंदाने राहत होते. शेख जानी हे वनविभागातून चौकीदार



पदावरून दहा वर्षांपूर्वीच निवृत्त झाले होते.निवृत्ती वेतनावर त्यांचा चरितार्थ सुरू होता. दरम्यान, त्यांची पत्नी मरियम बानो या गेल्या पाच वर्षांपासून अर्धांगवायूच्या (पॅरालिसिस) दुर्धर आजाराने त्रस्त होत्या. शनिवारी (दि. ६) डिसेंबर रोजी उपचारादरम्यान मरियम बानो यांचे निधन झाले. पत्नीच्या निधनामुळे शेख जानी यांना जबरदस्त मानसिक धक्का बसला.५० वर्षांची सोबत अचानक संपल्याने ते प्रचंड अस्वस्थ झाले होते. पत्नीच्या विरहाने व्याकुळ झालेल्या शेख जानी यांची प्रकृती सोमवार (दि. ८) रोजी सकाळी अचानक बिघडली. त्यांना मळमळ आणि चक्कर येऊ लागल्याने कुटुंबीयांनी त्यांना तातडीने पुढील उपचारासाठी यवतमाळला हलवण्याचा निर्णय घेतला. मात्र, नियतीला हे मान्य नव्हते. यवतमाळला नेत असतानाच वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली.

शेख जानी आणि मरियम बानो यांच्या पश्चात दोन विवाहित मुले, एक नुकतेच लग्न झालेली मुलगी, सुना आणि नातवंड असा मोठा परिवार आहे. अवघ्या ४८ तासांत घरातील कर्त्या आई-वडिलांचे छत्र हरपल्याने या कुटुंबावर दुःखाचे आभाळ कोसळले आहे.

## त्र्यंबकेश्वरमध्ये आईनेच तब्बल ६ मुलांना विकल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस

**दैनिक युवक आधार**

**नाशिक, प्रतिनिधी :**

जन्मदात्या आईने आपल्या बारा पैकी सहा मुलांना विकल्याचा धक्कादायक दावा सामाजिक कार्यकर्त्यांनी केल्याने जिल्हाभरात खळबळ माजली आहे. त्र्यंबकेश्वर तालुक्यातून हा प्रकार समोर आला आहे. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने तिने हा निर्णय घेतल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. यासंदर्भात महिला आणि तिच्या पतीला ताब्यात घेण्यात आले आहे. दरम्यान, या गंभीर प्रकाराची जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दखल घेत सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. प्राप्त माहितीनुसार, त्र्यंबकेश्वर तालुक्यातील टाके देवगाव येथील बरड्याच्या वाडीत हा प्रकार उघड झाला आहे. महिलेची चौदावी प्रसूती झाल्यानंतर दोन महिन्यांनी ही वार्ता एका आशासेविकेमुळे पुढे आली. संबंधित महिलेची प्रसूती झाल्यापासून आशा कार्यकर्तीची नेमणूक करण्यात आली होती. बाळ सुरक्षित घरी आणले गेले होते. मात्र, काही दिवसांनी आशा कार्यकर्ती बाळाचे वजन घेण्यासाठी गेली असता, त्यांना ते बाळ तिथे आढळले नाही. या संदर्भात आईला विचारणा केली असता आधी तिने उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, आशासेविकेने प्रश्नांची सरबत्ती केल्यानंतर महिलेने कबुली दिली. आम्हाला मुलांना पोसणे परवडत नाही, म्हणून आम्ही त्यांना दत्तक म्हणून दिले, असे उत्तर संबंधित महिलेने दिले. बाळाला दूध पाजणे शक्य नव्हते आणि आर्थिक अडचणींमुळे तिने हा निर्णय घेतला. मुलांच्या संख्येबाबत विचारले असता, तिने एकूण १२ मुले होती, त्यापैकी सहा जणांना विकल्याचा दावा आहे.या प्रकाराची प्रशासकीय स्तरावर गंभीर दाखल घेण्यात आली आहे. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. नाशिक ग्रामीण पोलिसांनी मंगळवारी रात्री उशिरा कारवाई करीत महिलेसह तीच्या पतीला ताब्यात घेतले.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक बातम्यांमध्ये प्रसारमाध्यमांनी भारत निवडणूक आयोगाचे चिन्ह वापरू नये – मुख्य निवडणूक अधिकारी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत प्रसारमाध्यमांकडून दिल्या जाणाऱ्या बातम्यांमध्ये भारत निवडणूक आयोगाशी संबंधित चिन्हे, इमारतींची दृश्ये किंवा मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या छायाचित्रांचा वापर केल्याची काही प्रकरणे दिसून आली आहेत. यातील संभ्रम दूर करण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांनी प्रसारमाध्यमांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने सांगितले की,




संसदीय, विधानमंडळ तसेच राष्ट्रपती –उपराष्ट्रपती निवडणुका घेण्याची जबाबदारी भारत निवडणूक आयोगाची असून राज्यात या कामकाजासाठी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते. सध्या महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून भारतीय प्रशासकीय अधिकारी एस. चोक्कलिंगम कार्यरत आहेत.

दुसरीकडे, संविधानातील अनुच्छेद 243के व 243झेडए नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधीक्षण, संचालन, निर्देशन आणि नियंत्रणाची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. महाराष्ट्रात राज्य निवडणूक आयुक्त पदावर निवृत्त प्रधान सचिव दिनेश वाघमारे कार्यरत आहेत.दोन्ही आयोगांची कार्यक्षेत्रे वेगवेगळी व स्वतंत्र असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांशी संबंधित बातम्यांमध्ये भारत निवडणूक आयोगाचे बोधचिन्ह, अधिकारी, इमारती अथवा तत्सम दृश्यांचा वापर करणे चुकीचे असल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले आहे.तसेच, राज्य निवडणूक आयोगाशी संबंधित बातम्यांमध्ये झालेल्या अशा चुकांची तातडीने दुरुस्ती करून संबंधित व्हिडिओ समाजमाध्यमांतून हटवावेत, असे आवाहनही मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून प्रसारमाध्यमांना करण्यात आले आहे.

## 'झेब्रु' शुभंकरामुळे रस्ता सुरक्षा जनजागृती मोहीम प्रभावी – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**नागपूर, प्रतिनिधी :** रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने 'झेब्रु' शुभंकराचा अनावरण परिवहन विभागाचे महत्त्वाचे पाऊल आहे. या शुभंकरामुळे अपघात रोखण्यासाठी रस्ता सुरक्षा जनजागृती मोहीम अधिक प्रभावी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

परिवहन विभागाच्यावतीने रस्ता सुरक्षा जनजागृतीसाठी झेब्रु शुभंकराचे अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते विधानभवन येथील मंत्री परिषद सभागृहात आयोजित सोहळ्यात करण्यात आले.

कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ, परिवहन विभागाचे अप्पर मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, वाढत्या नागरीकरणामुळे




वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस भर पडत आहे. अपघात रोखण्यासाठी राज्य शासन रस्ता सुरक्षा जनजागृती मोहिमेतून नागरिकांना वाहतूक नियमांबाबत जागरूक करण्यात येत आहे. अपघात होणारच नाहीत,




यासाठी नागरिकांना 'वाहतूक साक्षर' करण्याचा शासनाचा मानस आहे. या मोहिमेची ही फलश्रुती असून विविध विभागांच्या माध्यमांतून अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत.

नागरिकांनी वाहतुकीचे नियम पाळून रस्ता सुरक्षा मोहिमेत सहभाग घ्यावा. 'रस्ता सुरक्षा जीवन रक्षा' हा मूलमंत्र अंगीकारावा, असे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

प्रास्ताविकात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, झेब्रु शुभंकर हा रस्ता सुरक्षेचा संदेश वाहक आहे. पहिला हक्क पादचाऱ्यांचा या जाणिवेतून रस्ता सुरक्षा मोहीम राबविण्यात येणार आहे. ' झेब्रु' ला राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्यात येणार आहे. झेब्रु रस्ता सुरक्षेचा जिवंत आत्मा ठरेल, या पद्धतीने मोहिमेची अंमलबजावणी करण्यात येईल. पदपथांवर असलेले अतिक्रमण काढून तेथील रेलिंग न काढण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नगरविकास विभागाकडून नियमावली बनविण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार संबंधित विभागाकडून कार्यवाही करण्यात येईल.

कार्यक्रमात झेब्रु शुभंकरचे अनावरण करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांना झेब्रु असलेले सन्मानचिन्ह देण्यात आले. कार्यक्रमाला परिवहन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# वाढवण .. स्वप्नांचा विकास की निसर्गाचा विध्वंस

**अजय पांडुरंग कापरे**
**(दैनिक युवक आधार महाराष्ट्र संपादक )**



आज आमच्या नवीन कंपनीसाठी एक प्रोजेक्ट संदर्भात पालघर–वाढवण परिसरात जाण्याचा योग आला. मी याआधी कधीही पालघरला गेलो नव्हतो. त्या मुळे हा सर्व परिसर माझ्यासाठी नवीन होता. फक्त एवढंच ऐकून होतो — आगरी, कोळी-भंडारी, आणि बहुतांशी आदिवासी समाज येथे निसर्गासोबत एकरूप जीवन जगतो.

परंतु आज जेव्हा प्रत्यक्ष वाढवण परिसरात पोहोचलो…तेव्हा समरोचा नयनरम्य परिसर पाहून लक्षात आले

निसर्गाने येथे खुल्या हस्ताने उधळण केली आहे.

पालघर ते वाढवण —

दोन्ही बाजूंना आंबा, नारळ, सुपारी, केळी, चिक्कू यांच्या हिरव्यागार बागा… केळवे, माहीम, सातपाटी, वार्डोही असे छोटे पण सुंदर बीच…

तळकोकणासारख्या वाड्या आणि त्यांच्या कुशीत असलेली साधी पण टूमुकदार सधन घरे…या परिसरात राहणारी माणसे निसर्गामुळेच श्रीमंत आहेत, हे पहिल्याच क्षणी जाणवलं.रस्त्यात अनेक घरांसमोर टेबल आणि त्यावर लॅम्प दिसत होते.ते काय असावे? ही उत्सुकता मनात घेऊन गूगल बाईंना फॉलो करत आम्ही थेट वाढवण बंदर परिसरात पोहोचलो.

२०२४ ला भूमिपूजन झालेले प्रकल्प —वाटले होते रुंद रस्ते, मोठ्या गाड्या, जोरदार काम सुरू असेल.पण आमच्या समोर होता —फक्त ४ मीटर रुंद रस्ता आणि त्याच्या दोन बाजूंनी पसरलेली गर्द झाडी .आम्ही समुद्रकिनारी पोहोचलो.

समोर भव्य असा अरबी समुद्र — निखळ, स्वच्छ, शांत…पर्यटकांची काहीच वर्दळ नव्हती .फक्त काही मच्छीमारांच्या बोटी दूर डोलताना दिसत होत्या.अशी शांतता मी फक्त चित्रपटात पाहिली होती .

इतक्यात काही स्थानिक तरुण आमच्याकडे आले.आम्ही इथे येण्याचे कारण सांगितल्यावर ते म्हणाले "तुम्हाला कोणी अडवले नाही?

इथे बाहेरच्यांना येऊ देत नाही .आमचा या प्रकल्पाला विरोध आहे .काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून काही अंतरावर पोलिस आणि रॅपिड फोर्सची छावणी आहे."

त्या क्षणी जाणवले ,आम्ही निर्विघ्न इथपर्यंत पोहचलं म्हणजे आम्ही भाग्यवान आहोत त्यांच्याशी संवाद साधल्यावर त्यांच्या आवाजातली वेदना स्पष्ट जाणवली.

ते म्हणाले "या बंदरामुळे समुद्राच्या लगतची ४५ गावं उध्वस्त होतील.नालासोपारा ते डहाणूपर्यंतचा सगळा निसर्ग संपेल."

त्यांनी पुढे सांगितले —

"आम्हाला सरकारी नोकऱ्या नकोत.

जगातील सर्व प्रकारच्या दागिन्यांचे साचे आम्ही बनवतो.

तुम्ही घरासमोर पाहिलेले टेबल —

ते आमच्या कलेची ओळख आहे.

शेती, फळबागा, मासेमारी —

आम्ही सर्व प्रकारे सधन आहोत.

तुमच्या विकासाच्या बदल्यात

आमचा निसर्ग आणि आमचे स्वातंत्र्य द्यायचे?

आम्हाला सिमेंटचे जंगल नको!"

**त्यांनी नंतर जे सांगितले ते ऐकून अंगावर शहारे आले —**

"वाढवणच्या कातळावर प्रभू श्रीरामांनी राजा दशरथांचे पिंडदान आणि अस्थी विसर्जन केले होते.

वर्षातून फक्त अक्षय तृतीयेच्या दिवशी

हा कातळ समुद्रात उघडा पडतो ."

इतिहास आणि अध्यात्माची सांगड जिथे जुळते —

ती मातीच पवित्र!

ते पुढे म्हणाले —> "स्व. आनंद दिघे साहेब आणि

हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या उत्तरकार्याचे

हे पवित्र स्थळ आहे.हेही बंदराच्या राक्षसी विकासात नष्ट होणार आहे."त्यांची मागणी मनाला भिडणारी होती "आमचा विकास करायचाच असेल,तर आमचे पारंपरिक उद्योग वाढवा .कृषी-पर्यटन वाढवा!आमच्या केळी-चिक्कूला जागतिक बाजार द्या!चांगले रस्ते, आरोग्य, शिक्षण द्या!पण आमचा निसर्ग हिरावू नका!"

**परतीच्या वाटेवर मनात सतत विचारांची खल सुरू होती…**

रस्त्याच्या कडेला दिसलेली

कमळांनी नटलेली छोटी तळी,

उडणारे विविध पक्षी,

आणि दहा-वीस मीटर रुंद पारंब्या असलेली

शेकडो वडाची वृक्ष

हे सर्व विकासाच्या नावाखाली काही दिवसांत संपुष्टात येईल

मन भारी झाले.

फ्लेमिंगो पक्ष्यांचे थवे समुद्रावरून उडताना पाहिले होते —

हे परदेशी पाहुणे सीमा पार करून इथल्या निसर्गात रमायला येतात

काही वर्षांनी ते येतील का? येण्यास जागाच उरणार नाही तर येणार कुठे?

हो, विकास हवा!

पण — इतका विध्वंसक नको!

निसर्गाने दिलेली श्रीमंती

आपणच उद्ध्वस्त करतो आहोत.

मानव स्वार्थी झाला आहे —

पैसा सर्वस्व बनला आहे.

जर आपण हा निसर्ग जपणार नसलो

तर भविष्य पिढ्यांना देण्यासाठी

आपल्याकडे उरणार काय?

या प्रश्नांची उत्तरं आपल्यालाच शोधायची आहेत.

पर्यावरण प्रेमींनी, संवेदनशील माणसांनी

एकत्र येऊन विकास आणि निसर्ग यांच्यात

सुवर्णमध्य काढायलाच हवा!

## टोळक्यावर अॅट्रॉसिटी प्रकरणास वेगळे वळण; परस्पर विरोधी फिर्यादीवरून पोलिस पाटील व त्यांचे भावाविरुद्ध गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी :** सारोळे खुर्द ता.निफाड येथील पोलीस पाटील भाऊसाहेब बर्डे यांना झालेली शिवीगाळ व मारहाण प्रकरणी दाखल अॅट्रॉसिटी प्रकरणाला वेगळे वळण लागले आहे. फिर्यादी पोलीस पाटील व त्यांचे भावाविरुद्ध परस्परविरोधी फिर्याद दाखल करण्यात आली असून त्यावरून पोलीस पाटील व त्यांचे भावाविरुद्ध लासलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.फिर्यादी रतन दामोदर नागरे यांनी लासलगाव पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत, दिनांक ४ डिसेंबर रोजी रात्री ९ वाजेचे सुमारास आमचे गावातील म्हसोबा महाराजाची यात्रा असल्याने, रथ मिरवणूक संपल्याने मी व माझा मुलगा किरण रतन नागरे आमचे घरी जात असताना संदीप हॉटेलवर थांबलो होतो. तेव्हा तेथे गावातील निखिल नाईक व रवि पिंपळे यांच्यात शाब्दिक भांडण चालू होते. ते मी भांडण सोडवत असताना तेथे आमच्या गावातील पोलीस पाटील भाऊसाहेब खंडु बर्डे हे आले. त्यांनी मला धक्का दिला व ' तुम्ही इथे कशाला भांडण करता?' असे बोलले. त्यावेळेस मी त्यांना बोललो की, ' मला धक्का का दिला? माझे भांडण नाही, मी त्यांचे भांडण सोडवत होतो, तुम्ही त्यांना समजून सांगा' असे बोलत असताना माणिक खंडु बर्डे तेथे आल्यानंतर ' माझ्या भावाशी का वाद घालतो?' असे बोलून वाईटसाईट शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी मला मारहाण करू लागले असता त्यांना माझा मुलगा व मी समजावत असताना भाऊसाहेब खंडू बर्डे यांनी हातातील लाकडी काठीने माझ्या मुलाच्या डोक्यात पाठीमागून मारून दुखापत केली व 'तुम्ही आमच्या विरोधात तक्रार केली तर मी तुमच्यावर जातीवाचक शिवीगाळ केल्याबाबत तक्रार दाखल करीन' असा दम दिला. त्यावेळी तो खाली जमिनीवर पडला. त्यावेळी माझ्या मुलाने आरडाओरड केल्याने आमच्या गावातील ऋषिकेश नागरे, गणेश नागरे, प्रकाश नागरे, सचिन नागरे, गणेश निवृत्ती नागरे, कैलास आव्हाड अशांनी माझ्या मुलाच्या डोक्यातून रक्त येत असल्याने त्याला खाजगी वाहनाने साई मल्टिपेशालिटी हॉस्पिटल निफाड येथे उपचारासाठी नेले. तेथे डॉक्टरांनी मुलाला अॅडमिट करून घेतले. त्यानंतर मुलगा किरण यांस आज रोजी बरे वाटू लागल्याने मी पोलिस स्टेशनला तक्रार देण्यासाठी आलो आहे असे म्हटले आहे.त्यांच्या फिर्यादीवरून लासलगाव पोलिस ठाण्यात भा.दं.वि. २०२३ चे कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार औदुंबर मुरडनर अधिक तपास करीत आहेत.

## बारावर्षीय जलतरणपटू मयंक म्हात्रे यांनी भाऊचा धाक्का ते करंजा जेट्टी 24 किमी अंतर 7 तस 21मिनिटात पोहुन केला नवा विक्रम

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील :** उरण हे जागतिक कीर्तीचे बेट असून सभोतली अरबी समुद्राच्या खडीने सरापरीसर व्यापलेला आहे त्यामुळेया बेटावर अनेक जलतरणपटू होऊन गेलेत या सर्वांच्या परंपरेचा वसा सांभाळतउरणच्या १२ वर्षीय मयंक म्हात्रे याने भाऊचा धाक्का ते करंजा जेट्टी हे 24 कि.मी.अंतर केवळ 7 तास 21 मिनिटे 6 सेकंदात पोहुन नवा विक्रम स्थापित केला आहे.त्यामुळे आज पर्यतच्या जलतरणपटू मध्ये मयंक म्हात्रे हा भाऊचा धक्का ते करंजा जेट्टी पोहून पार करणारा पहिला जलतरणपटू ठरला आहे. मयंक म्हात्रे हा उरणातील सेंटमेरीज कॉन्व्हेन्ट स्कुलमध्ये इयत्ता सातवी मध्ये शिकत आहे.त्याच्या नव्या विक्रमाचे सर्व स्थरामधून स्वगत करण्यात आले असूनत्याचवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सोमवारी पहाटे 03:55 वाजता भाऊचा धक्का येथून मयंकने समुद्राच्या




लाटांवर झेप घेत आपल्या नव्या विक्रमाचा शुभारंभ केला,पहाटे समुद्रातदूरवर पसरलेला अंधार समुद्राच्या थंडपाण्याच्या स्पर्शा बरोबर मोकळया हवेंतील गार हवा, बरोबरीने उसळणाऱ्या सागरी लाटा मोठमोठ्या जहाजांचा मधून अडथळयाची शर्यत यातून मार्ग काढत त्याने निर्धारीत वेळेत आपला विक्रम पूर्ण केला,त्याने केलेल्या या विक्रमची नोंद महाराष्ट्र राज्य हौशी जलतरण संघटनेने दखल घेतली असून त्याच्या विक्रमची नोंद केली आहे. याआधी कु.मयंकने धरमतर ते करंजा आणि घारापुरी ते करंजा हे प्रवाह पोहून पार केले होते तर आज त्याने भाऊचा धक्का ते करंजाजेट्टी हे 24 कि.मी.अंतर केवळ 7 तास 21 मिनिटे 6 सेकंदात पोहून पार केलेहे अरबी समुद्रांतील उरण-मुंबई-करंजा खाडीतील तिनही प्रवाह प्रथम पोहून पार करण्याचा मान व त्याच्या विक्रमाची नोंद मयंकच्या नावाने झाली आहे.करंजा जेट्टीवरमयंक म्हात्रे याचे आगमन होताच करंजा गावांतीलसामजिक कार्यकर्ते तथा समाजसेवक सचिन डाऊर व करंजा ग्रामस्थांनी त्याचे जल्लोषात स्वागत करूनत्याचे अभिनंदन केले.

**समुद्रांतील बदलते हवामान आणि खडतर प्रवास यातून कुठेतरी मयंकाचा आजचा विक्रमी प्रवास मी थांबवण्याच्या पवित्र्यात होतो. मात्र मयंकची जिद्ध आणि इव्हेन्ट पूर्ण कारण्यासाठीची त्याचा कमालीचा आत्मविश्वास पहाता त्याला त्याच्या प्रयत्नासाठी साथ देण्याचा निर्णय घेतला, त्याने त्याने सर्व अडथळयांवर मात करीत भाऊचा धक्का ते करंजा जेट्टी हे 24 कि.मी. अंतर पोहून पार करणारा तो पहिला जलतरणपटू ठरला आहे.आता त्याला परदेशांतील चॅनेल पोहण्याचा विक्रम करावयाचा आहे मयकने आज केलेला विक्रम खूप कौतुकास्पद आहे. त्याने प्रयत्नाची शिकस्त करून आपला इव्हेन्ट पूर्ण केला. इतर जलतरणपटूनी मयंक म्हात्रे कडून प्रेरणा घ्यावी आणि आपल्या प्रयत्नांना नावे पंख द्यावेत. –**

**दिनेश म्हात्रे,**
**मयंकचे वडील**

## काही जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षक अपुऱ्या तर विद्यार्थी नसलेल्या शाळेत शिक्षक पुऱ्या पुऱ्या

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी/महादेव उप्पे :** देगलूर(दि.१०) मागील काही वर्षांपासून जिल्हा परिषद शाळेची दयनिय अवस्था होत आहे हे द्रष्य शिक्षण विभागापासून ते सामान्य जनतेच्या निदर्शनास येत आहे परंतू याची दखल मात्र कोणीच घेत नसल्यामुळे गोरगरीब जनतेला याचा फटका बसत आहे.अशीच घटना देगलूर तालुक्यातील मौजे हणेगाव येथील जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय,जिल्हा परिषद मुलींची शाळा व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महेबूबनगर येथे घडत आहे.हणेगाव येथील जिल्हा परिषद मुलांच्या शाळेत प्राथमिक साठी एक शिक्षक माध्यमिक साठी दोन शिक्षक मुख्याध्यापक पद एकाची अशा चार शिक्षकांची पदे रिक्त आहेत तर याठिकाणी पहिली ते आठवीसाठी एकशे नव्यानव विद्यार्थी तर नववी ते दहावीसाठी अठ्ठावीस विद्यार्थी उपस्थित आहेत.तसेच जिल्हा परिषद मुलींची शाळा हणेगाव येथे एकशे बावन विद्यार्थीनींची संख्या असून याठिकाणी सात शिक्षकांची गरज असताना चार शिक्षकांवरच शाळेचा कारभार चालतो तर हणेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महेबूबनगर येथे एकोनीस विद्यार्थी असताना तीन शिक्षकांचा कारभार चालतो. याचा अंदाज कुणालाच माहीत नाही.

देगलूर तालुक्यातील मौजे हणेगाव हे शिक्षणासाठी प्रसिद्ध असून या भागातील अनेक विद्यार्थी विद्यार्थीनी मोठमोठ्या पदावर कार्यरत आहेत तर आताच्या घडीला हणेगाव येथील जिल्हा परिषद शाळेचे बारा वाजल्या कारणाने विद्यार्थी बाहेर गावी शिक्षणास प्रोत्साहन देणे आवश्यक समजत आहेत,याला जबाबदार कोण? काही जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थी विनाच शाळा भरते आणि शिक्षक एकमेकांना सहकार्य करीत सुट्यांचा मौजमजा करतात याला जिम्मेदार कोण? जिल्हा परिषद शाळेतील प्रशिक्षणाच्या वेळेस विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते याला जिम्मेदार कोण? जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांची पदे रिक्त असल्याची गटशिक्षणाधिकारी यांना माहिती देणे आवश्यक नाही का? केंद्रप्रमुख विस्तार अधिकारी यांची निवड करण्यामागचे कारण काय?शिक्षक शाळेत उपस्थित नसल्याची माहिती दिली असता त्या शिक्षकावर कसल्याच प्रकारची कार्यवाही नाही याला जिम्मेदार कोण?वारंवार गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे शिक्षकांची मागणी करून सुद्धा या गोष्टींकडे दुर्लक्ष करणे योग्य का? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत परंतू याचा फटका मात्र या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बसत आहे.सद्याची परिस्थिती पाहता नवोदय परिक्षा,स्कॉलरशिप परिक्षा,सेमी इंग्रजी अशा माध्यमातून विद्यार्थ्यांची शिक्षणामध्ये वरचढ होत असताना शिकविण्यासाठी शिक्षकच नसतील तर विद्यार्थी काय करणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## सुस्त वनविभाग,महावितरण विभाग बेजाबदार, आ.अंतापूरकर आक्रमक; बिबट्यांचा बंदोबस्त करा – आमदार जितेश अंतापूरकर

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी/महादेव उप्पे**

**देगलूर :** देगलूर–बिलोली मतदारसंघासह संपूर्ण नांदेड जिल्ह्यात बिबट्यांच्या वाढत्या वावरामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामीण भागातील शेतकरी,नागरिक अक्षरशःदहशतीत दिवस काढत आहेत.याच पार्श्वभूमीवर देगलूर बिलोली मतदार संघाचे आमदार जितेश अंतापूरकर यांनी हिवाळी अधिवेशनात 'पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन'द्वारे हा गंभीर मुद्दा उपस्थित करत शासनाचे लक्ष वेधले.

गेल्या काही आठवड्यांपासून बिबट्या तसेच अन्य हिंस्र वन्यप्राण्यांचे दर्शन नागरी वस्त्यांमध्ये होत असल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. काही ठिकाणी दिवसा शेतावर जाणेसुद्धा शेतकऱ्यांना धोकादायक ठरत आहे. त्यात भर म्हणून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या ढिसाळ नियोजनामुळे दिवसा लोडशेडिंग तर रात्री वीजपुरवठा सुरू असल्यानं,पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना मध्यरात्री शेतावर जावे लागत आहे.बिबट्या आणि वाघांच्या हालचाली वाढलेल्या काळात हा प्रवास 'जीवावर उदार होऊन' करावा लागत असल्याचे आमदार जितेश अंतापूरकर यांनी स्पष्ट केले.

यावेळी वनविभागाच्या निष्क्रीयतेमुळे बिबट्या,वाघ यांसारखे वन्यजीव सर्रास वस्तीमध्ये फिरताना दिसत असून राज्यभरात अशा घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे.काही ठिकाणी पाळीव जनावरेच नव्हे तर लहान मुले आणि वयोवृद्ध नागरिकही या हिंस्र प्राण्यांच्या हल्ल्याचे बळी पडल्याच्या घटना वाढत असल्याचा त्यांनी उल्लेख केला.

या सर्व परिस्थितीची तत्काळ दखल घेऊन वनविभागाला संबंधित बिबट्यांना पकडण्याचे आदेश देण्यात यावेत तसेच दिवसाची लोडशेडिंग तातडीने थांबवावी, अशी कडवी मागणी अंतापूरकर यांनी सभागृहात केली.नागरिक आणि शेतकरी सुरक्षित राहण्यासाठी शासनाने त्वरित उपाययोजना करणे अत्यावश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

एकीकडे बिबट्यांचा नागरीक वस्तीत वावर मोठ्या प्रमाणात होत असताना संबधित वनविभागाचे अधिकारी अक्षम्य दुर्लक्ष करीत सुस्त असून परिणामी नागरीक भयभीत आहेत. दूसरीकडे महावितरण विभागाच्या अक्षम्य दुर्लक्ष व असंवेदनशीलतेमुळे परिणामी रब्बी हंगामात बळीराजाला रात्रीला शेतात पाणी द्यावे लागत असून बळीराजा जिवावर उदार होत आहे यामुळे वनविभाग बिबट्यांचा बंदोबदस्त व महावितरण कंपनीने दिवसा विज वितरण सुरळीत चालू ठेवण्याची सुचना सभागृहाच्या माध्यमातून सुचना केल्या आहेत.

## कंत्राटदाराला पाठीशी घालणाऱ्या मनपा एन विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी ; स्थानिक नागरिकांची कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर (केतन भोज) :** घाटकोपर पश्चिम प्रभाग क्रमांक १२३ जंजिरा सोसायटी,रामनगर(ब) येथील स्थानिक नागरिकांकरिता अगोदर याठिकाणी दुमजली शौचालय होते.तरी शौचालय दुरुस्तीच्या नावाखाली जुने दुमजली शौचालय पाडून त्याच ठिकाणी आता नवीन शौचालय बांधण्यात येणार आहे.परंतु येथील शौचालयच्या पुनर्बांधणीचे काम मागील दोन वर्षांपासून रखडलेल्या स्थितीत असल्यामुळे स्थानिक नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे.तसेच येथील जुने शौचालय पुनर्बांधणीसाठी पाडण्यात आल्यामुळे स्थानिक नागरिकांसाठी याठिकाणी संबंधित मनपा एन विभाग तसेच संबंधित शौचालय बांधकामाच्या कंत्राटदाराकडून तात्पुरती शौचालयाची व्यवस्था करून देण्यात आली असली तरी त्या तात्पुरती शौचालयांची रोजच्या रोज स्वच्छता होत नसल्यामुळे आणि तात्पुरती शौचालयांची अवस्था देखील बिकट झाल्यामुळे स्थानिक नागरिकांना मोठ्याप्रमाणावर अस्वच्छतेला सामोरे जावे लागत असून स्थानिक नागरिकांची कुचंबना होत आहे.तसेच संबंधित मनपा एन विभागाचे तसेच शौचालय बांधकामाच्या कंत्राटदाराचे याठिकाणी दुर्लक्ष होत आहे त्यामुळे स्थानिक नागरिक याविरुद्ध प्रचंड संताप व्यक्त करताना दिसत आहेत.



जंजिरा सोसायटी,रामनगर(ब) येथील शौचालयच पुनर्बांधणीसाठी मुंबई महानगरपालिका एन विभागाकडून टेंडर काढून देखील संबंधित कंत्राटदाराने येथील दुमजली शौचालययाचे बांधकाम विहित कालावधीत पूर्ण न केल्याने मनपा एन विभाग प्रशासन या शौचालय पुनर्बांधणीच्या कामात कुचराई करणाऱ्या कंत्राटदारावर कोणत्याही प्रकारची कारवाई करताना का दिसत नाही ? संबंधित मनपा एन विभाग परिरक्षण विभागाचे प्रभाग क्रमांक १२३ चे संबंधित अधिकारी याठिकाणी कंत्राटदाला पाठीशी घालताना दिसत असून त्या अधिकाऱ्यांचे देखील या शौचालयच्या कंत्राटदारासोबत काही आर्थिक हितसंबंध आहेत का ? याची मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त गजानन बेल्लाळे यांनी चौकशी करणे गरजेचे आहे.तसेच येथील शौचालयाचे बांधकाम तत्काळ पूर्ण करण्यात यावे अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहेत.